दैनिक
राज्य लोकतंत्र
www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

विनम्र अभिवादन!

राष्ट्रपिता महात्मा गांधी व माजी पंतप्रधान लाल बहादुर शास्त्री यांच्या जयंती निमित्त विनम्र अभिवादन !
-संपादक

बीड – महाराष्ट्र | वर्ष – ४ | अंक–१६१ | बुधवार दि.२ ऑक्टोबर २०२४ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | • पाने– ६ | किंमत ३ रूपये

संपादकीय

मतदान टक्का वाढलाच पाहिजे

महाराष्ट्राच्या आगामी विधानसभा निवडणुकीच्या तयारीचा आढावा घेण्यासाठी मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार निवडणूक आयुक्त ग्यानेश कुमार आणि डॉ. सुखबीर सिंह संधू दोन दिवसांच्या मुंबई दौऱ्यावर आले होते. राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींची तसेच निवडणूक कामाची जबाबदारी असलेल्या अधिकाऱ्यांची आणि पोलिस अधिकाऱ्यांच्या बैठका घेऊन त्यांनी सर्व आढावा घेतला. दिवाळीनंतर आगामी विधानसभा निवडणुका होणार असल्याचे संकेत केंद्रीय निवडणूक आयोगाचे आयुक्त राजीव कुमार यांनी दिले आहेत.

शेतकऱ्यांचा उधा देशव्यापी रेल्वे रोको

हमीभाव कायद्यासह विविध मागण्यांसाठी आंदोलन

दिल्ली । वृतसंस्था

गेल्या सहा ते सात महिन्यांपासून हरियाणाच्या शंभू आणि पंजाबच्या खनौरी सीमेवर शेतकरी आंदोलन करत आहेत. शेतकरी हमीभाव कायद्यासह विविध मागण्यांसाठी आंदोलन करत आहेत. तर आता याच मागणीसाठी देशव्यापी रेल्वे रोको आंदोलनाची हाक दिली जाणार आहे. ३ ऑक्टोबर रोजी दोन तास रेल्वे रोको आंदोलन केले जाईल, अशी माहिती किसान मजदूर संघर्ष समितीचे शेतकरी नेते सर्वनसिंह

पंढेर यांनी मंगळवारी (दि.१) दिली.

शेतकऱ्यांनी आपल्या मागण्यांसाठी १३ फेब्रुवारीपासून आंदोलन सुरू केले आहे. याबाबत ◀◀ पान २ वर

योग्य भावात डीएपी द्या

याचबरोबर आमचे धान पीक येथील मार्केटमध्ये पडून आहे. ते खराब होत आहे. सरकारने धान उचलण्याचे आश्वासन दिले होते. ते पूर्ण करून धानाची उचल करावी. रब्बी पिकांच्या पेरणी जवळ आली असून डीएपीचा काळाबाजार सुरू झाला आहे. यामुळे शेतकऱ्यांची लूट होत आहे. तरी डीएपी खताच्या टॅगिंगकडे सरकारने लक्ष देऊन डीएपी खत शेतकऱ्यांना योग्य दरात उपलब्ध करून देण्यासाठी सरकारने प्रयत्न करावेत, अशीही मागणी शेतकरी नेते सर्वनसिंह पंढेर यांनी केली आहे.

महाराष्ट्रातील पूरग्रस्तांसाठी केंद्राचे १ हजार ४९२ कोटींचे पॅकेज

१३ राज्यांसाठी ५,८५८.६० कोटी रुपयांचा निधी

नवी दिल्ली । वृतसंस्था

केंद्रीय गृहमंत्रालयाने महाराष्ट्रातील पूरग्रस्त भागांसाठी १ हजार ४९२ कोटी रुपयांचा निधी मंगळवारी जारी केला. आसाम, मिझोराम, केरळ, त्रिपुरा, नागालँड, गुजरात, आंध्र प्रदेश, तेलंगणा आणि मणिपूर या पूरग्रस्त राज्यांमध्ये नुकसानीचे मूल्यांकन करण्यासाठी सरकारने आंतर-मंत्रालयीन केंद्रीय पथके पाठवली होती. त्यांच्या अहवालानंतर हा निधी जारी करण्यात आला आहे. यामध्ये महाराष्ट्रासह इतर १३ पूरग्रस्त राज्यांसाठी ५,८५८.६० कोटी रुपयांचा निधी जारी करण्यात आला आहे.

◀◀ पान २ वर

संस्थाचालक, सचिवाचा अटकपूर्व जामीन फेटाळला

ठाणेः बदलापूर येथील एका शाळेत दोन लहान मुलींवर झालेल्या लैंगिक अत्याचार प्रकरणी उच्च न्यायालयाने मंगळवारी संस्थाचालक आणि सचिवाचा अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळला आहे. संस्थाचालक आणि सचिवाने यापूर्वी सत्र न्यायालयात अटकपूर्व जामिनासाठी अर्ज केला होता, तेथून हा अर्ज फेटाळल्यानंतर दोघांनी उच्च न्यायालयात धाव घेतली होती. याच प्रकरणात मुंबई उच्च न्यायालयात खटला सुरू आहे. या सुनावणी दरम्यान न्यायमूर्ती रेवती मोहिते डेरे आणि पृथ्वीराज चव्हाण यांनी पोलिसांना फैलावर घेतले. ◀◀ पान २ वर

माजलगावची जागा राष्ट्रवादीलाच- उपमुख्यमंत्री अजित पवार

आ.प्रकाश सोळंकेनाच उमेदवारी देण्याचे उपमुख्यमंत्री अजित पवारांचे संकेत

माजलगाव। प्रतिनिधी

लोककल्याणकारी योजना राबवण्यास महायुतीचे शासन कटीबध्द आहे. राज्यातील प्रत्येक घटकाकरीता योजना राबवण्यात येत आहेत.त्या योजना त्यांच्यापर्यंत पोहचवण्याचे प्रयत्न सर्वांनी करणे आवश्यक असून माजलगाव विधानसभा मतदार संघाची जागा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीलाच सुटणार असा दावा राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केला.एवढेच नव्हे तर तुमच्या मनामध्ये जो उमेदवार आहे त्या उमेदवारालाच उमेदवारी दिली जाईल

असा शब्द देत अजित पवारानी एक प्रकारे आ.प्रकाश सोळंके यांच्या उमेदवारीचेच पुन्हा एकदा संकेत दिले आहेत.

माजलगाव येथील मंगलनाथ मैदानावर दि ०१ ऑक्टोबर मंगळवार रोजी दुपारी उपमुख्यमंत्री अजित पवार याच्या जनसन्मान यात्रेची सभा झाली. यावेळी व्यासपीठावर पालकमंत्री धनंजय मुंडे, आ.प्रकाश सोळंके, आ.विक्रम काळे, जयसिंग सोळंके आदि उपस्थित होते. यावेळी बोलताना उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले की, शेतकऱ्यांसह ◀◀ पान २ वर

शेवटच्या श्वासापर्यंत मतदार संघाची सेवा करणार–आ. सोळंके

जनसन्मान यात्राच्या मेळाव्या दरम्यान बोलताना आ.प्रकाश सोळंके म्हणाले की,सोळंके कुटूंबियाने स्व.सुंदरराव सोळंके साहेबांपासून या मतदार संघाची सेवा केली आहे.मी ही शेवटचा श्वास असेपर्यंत या मतदार संघाची सेवा करणार असल्याचे आ. प्रकाश सोळंके यांनी सांगितले.तर या मेळाव्या दरम्यान आ.प्रकाश सोळंके यांनी कोणत्याही प्रकारच्या राजकीय निवृत्तीचा उल्लेख न करता राजकीय वारसदाराची घोषणा न केल्याने विधानसभा निवडणुकीसाठी आ.सोळंके यांनी पुन्हा एकदा दंड थोपटणार असल्याची चर्चा होता आहे.

आ.प्रकाश सोळंकेंचे कौतुक

मेळव्या दरम्यान उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आ.प्रकाश सोळंके यांचे कौतुक करत त्यांच्याच उमेदवारीचे संकेत देत म्हणाले की,माजलगाव मतदारसंघाला विकासाच्या बाबतीत अधिकाधिक निधी उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न आम्ही केला. आमदार प्रकाश सोळंके यांनी या मतदारसंघात केलेली कामं उल्लेखनीय आहेत. सोळंके यांनी कायमच विकासाला प्राधान्य देण्याचं काम केलं. विविध प्रकल्प, योजनांना मी वित्त मंत्री या नात्याने माजलगावसाठी पूरक निधी दिला.

बीडच्या जिल्हा शल्य चिकित्सकपदी डॉ.थोरात

पदभार स्विकारत केली कामकाजाला सुरुवात

बीड। प्रतिनिधी

जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. अशोक बडे यांची परभणी येथे बदली झाली असून त्यांच्या जागी डॉ. अशोक थोरात यांची नियुक्ती करण्यात आली आहे. मंगळवारी त्यांनी पदभार स्वीकारला असून जिल्हा रुग्णालयाची पाहणी करून त्यांनी कामकाजाला सुरुवात केली आहे.

लोकसभा निवडणुकीच्या कार्यकाळात व त्यानंतरही जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. अशोक बडे यांच्या कामकाजाच्या ◀◀ पान २ वर

बीडःजिल्हा शल्य चिकित्सक डॉक्टर अशोक थोरात यांनी पदभार स्वीकारल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी दैनिक लोकतंत्रचे कार्यकारी संपादक अशोक खाडे, मराठी पत्रकार परिषदेचे विभागीय अध्यक्ष सुभाष चौरे, जेष्ठ पत्रकार नाना नागरे, अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. नागेश चव्हाण आदी उपस्थित होते.

वैद्यकीय महाविद्यालयाचे श्रेय घेण्यावरून जालन्यात राजकीय वाद पेटला !

खोतकर म्हणतात काहीजण आयत्या बिळावरचे नागोबा तर आ.गोरंट्याल म्हणाले जनतेला माहित मेडिकल कॉलेज कोणी आणले

जालना । प्रतिनिधी

महाराष्ट्र शासनाने ३० सप्टेंबर रोजी जालना येथे शंभर विद्यार्थ्यांसाठी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय सुरू करण्यास परवानगी दिली आहे. मात्र याच्या श्रेय वादावरून आता जालन्यात राजकीय वाद पेटला आहे. मंगळवारी काँग्रेसचे आ.कैलास गोरंट्याल व माजी मंत्री अर्जुनराव खोतकर या दोघांनी वेगवेगळ्या ठिकाणी पत्रकार परिषद घेत वैद्यकीय महाविद्यालय आपणच आणले असल्याचा दावा करण्याचा प्रयत्न करीत एकमेकांवर टीका केली.

आगोदर झालेल्या पत्रकार परिषदेमध्ये आ.कैलास गोरंट्याल म्हणाले की, जालना शहराचा विकास कोणी केला या संदर्भात आत्तापर्यंतचा सगळा इतिहास जनतेला माहित आहे. यावेळी ◀◀ पान २ वर

अंबाजोगाई सहकारी साखर कारखान्याला गतवैभव मिळवून देण्यासाठी संचालक मंडळ प्रयत्नशील-रमेशराव आडसकर

अंबाजोगाई सहकारी साखर कारखान्याची ४७ वी वार्षिक सर्वसाधारण सभा

अंबाजोगाई । प्रतिनिधी

अंबाजोगाई सहकारी साखर कारखाना लि.अंबांसाखरची ४७ वी वार्षिक सर्वसाधारण सभा कारखान्याच्या प्रांगणात सोमवार, दिनांक ३० सप्टेंबर २०२४ रोजी संपन्न झाली. यावेळी बोलताना चेअरमन रमेशराव आडसकर यांनी अंबाजोगाई सहकारी साखर कारखान्याला गतवैभव मिळवून देण्यासाठी संचालक मंडळाने पुढाकार घेतला आहे. हा कारखाना चांगल्या पद्धतीने चालविण्याचा प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

प्रारंभी अहवाल वर्षातील दिवंगतांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. त्यानंतर अहवालाचे वाचन करण्यात आले, त्यास उपस्थित सभासदांनी टाळ्यांच्या गजरात मंजुरी दिली. यावेळी सर्वसाधारण सभेचे अध्यक्ष म्हणून बोलताना चेअरमन रमेशराव आडसकर म्हणाले की, आपल्या कारखान्याच्या ४७ व्या वार्षीक सर्वसाधारण सभेस सर्वजण उपस्थित राहिलात या बद्दल संचालक मंडळाचे वतीने मी सर्वांचे हार्दीक स्वागत करून दिनांक १ एप्रिल २०२३ ते ३१ मार्च २०२४ अखेर संपलेल्या आर्थिक वर्षाचा कारखान्याच्या कामकाजाचा वार्षिक अहवाल व ◀◀ पान २ वर

अनधिकृत बांधकामे धर्म पाहून पाडता येणार नाहीत !

मार्गदर्शक तत्वे सर्व धर्मांसाठी लागू असतील – सर्वोच्च न्यायालय

नवी दिल्ली । वृतसंस्था

बुलडोझर कारवाई प्रकरणी सर्वोच्च न्यायालयात मंगळवारी (दि. १) सुनावणी झाली. बुलडोझर कारवाईवर केंद्र आणि राज्य सरकारांना सर्वोच्च न्यायालयाने निर्देश द्यावे, अशी मागणी सर्वोच्च न्यायालयात करण्यात आली आहे. त्यावर न्यायालयाने ◀◀ पान २ वर

राहुल गांधी चार, पाच ऑक्टोबर रोजी कोल्हापूर दौऱ्यावर

कोल्हापूर । प्रतिनिधी

काँग्रेस नेते आणि लोकसभेतील विरोधी पक्ष नेते राहुल गांधी हे ४ आणि ५ ऑक्टोबर रोजी कोल्हापूर दौऱ्यावर येत आहेत. कसबा बावडा येथील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे अनावरण राहुल गांधी यांच्या हस्ते होणार असून, कोल्हापूर येथे होणाऱ्या संविधान सन्मान संमेलनाला ते उपस्थित राहणार असल्याची माहिती विधान परिषदेतील काँग्रेसचे गटनेते आमदार सतेज पाटील यांनी दिली.

राहुल गांधी शुक्रवारी ४ ऑक्टोबर रोजी कोल्हापुरात येत असून त्या दिवशी त्यांचा मुक्काम असेल. शुक्रवारी सायंकाळी ६ वाजता कसबा बावडा ◀◀ पान २ वर

बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.०१ ऑक्टोबर २०२४

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

	किमान	कमाल	सरासरी
गहू: ५.०० क्विंटल			
	२,५००	२,७७५	२,६२४
ज्वारी/हायब्रिड: ९३.५० क्विंटल			
	१,८००	२,७००	२,१३३
मूग : ४८.५० क्विंटल			
	६,१०१	८,०००	७,२४७
तूर :१.०० क्विंटल			
	७,०००	८,९३०	७,९६५
उडीद : १०६.०० क्विंटल			
	५,७६०	७,२५१	६,४८९
बाजरी :२२.०० क्विंटल			
	२,३००	२,५००	२,३८७
मुग : १०.५० क्विंटल			
	६,६०१	७,३११	७,००३
सोयाबीन:३९७.५० क्विंटल			
	२,९००	४,५८१	३,९०४
हरभरा: ३.५० क्विंटल			
	४,०००	७,५००	६,२५३

राज्यातून दरवर्षी ६४ हजार मुली बेपत्ता !

काँग्रेसची 'लापता लेडीज' मोहीम राज्य सरकारच्या नाकात दम आणणार

महिला असुरक्षीत असल्याचा दावा

महाराष्ट्रामध्ये मागील महिन्यात बदलापूरमधील प्रकरणानंतर तसेच इतरही काही प्रकरणे समोर आल्यानंतर महिलांविरोधातील अत्याचाराच्या मुद्यावरून विरोधकांकडून सरकारवर निशाणा साधण्यात आला. एकीकडे सरकारी योजनेअंतर्गत महिलांना महिना दीड हजार रुपये दिले जात असतानाच दुसरीकडे महिला सुरक्षित नसल्याचे गुन्हेगारीच्या आकडेवारीवरून स्पष्ट होत असल्याचा दावा विरोधकांनी केला आहे.

राज्याची कायदा व सुव्यवस्था ढासळली

गृहमंत्री आणि त्यांचे काम पूर्णतः निष्क्रिय ठरले आहे. हे सरकारचे अपयश असून ज्यामुळे महाराष्ट्रातील महिलांची सुरक्षा धोक्यात आली असून राज्याची कायदा व सुव्यवस्था ढासळली आहे, अशी टीका काँग्रेसने केली आहे.

मुंबई । प्रतिनिधी

ऑस्करसाठी निवड झालेला 'लापता लेडीज' हा चित्रपट आता महाराष्ट्राच्या राजकारणामध्ये चर्चेचा विषय झाला आहे. यामागील कारण म्हणजे याच चित्रपटाच्या नावाने काँग्रेस पक्षाने 'लापता लेडीज' मोहीम सुरू केली असून, राज्यभरामध्ये पोस्टरबाजी करत थेट सरकारवर निशाणा साधण्यात आला आहे. राज्यातून दरवर्षी ६४ हजार मुली बेपत्ता होत आहेत, ही चिंतेची बाब असून



पोस्टरवर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांचे फोटो देखील छापण्यात आले आहेत. दरम्यान, सरकारच्या लाडकी बहिण योजनेच्या पार्श्वभूमीवर काँग्रेसची ही मोहिम सरकारच्या नाकात दम आणणार असल्याचे सांगितले जात आहे.

महा विकास आघाडी सत्ताधारी महायुतीला कोंडीत पकडण्याचा प्रयत्न करत आहे. याच पार्श्वभूमीवर काँग्रेसने राज्याचा गंभीर मुद्दा उपस्थित करत महायुती सरकारवर निशाणा साधला ◀◀ पान २ वर

अग्रलेख

मतदान टक्का वाढलाच पाहिजे

महाराष्ट्राच्या आगामी विधानसभा निवडणुकीच्या तयारीचा आढावा घेण्यासाठी मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार निवडणूक आयुक्त ग्यानेश कुमार आणि डॉ. सुखबीर सिंह संधू दोन दिवसांच्या मुंबई दौऱ्यावर आले होते. राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींची तसेच निवडणूक कामाची जबाबदारी असलेल्या अधिकाऱ्यांची आणि पोलिस अधिकाऱ्यांच्या बैठका घेऊन त्यांनी सर्व आढावा घेतला. दिवाळीनंतर आगामी विधानसभा निवडणुका होणार असल्याचे संकेत केंद्रीय निवडणूक आयोगाचे आयुक्त राजीव कुमार यांनी दिले आहेत.

निवडणूक हा लोकशाहीचा उत्सव आहे; परंतु दुर्दैवाने शहरी भागात मतदारांमध्ये बरीच उदासिनता दिसते, अशी खंत व्यक्त करताना लोकशाहीच्या उत्सवात सहभागी होऊन मतदानाचा हक्क आणि कर्तव्य बजावा, असे आवाहन राजीव कुमार यांनी केले. मागील लोकसभा निवडणुकीत कुलाबा, कल्याणमध्ये कमी मतदान झाल्याचे निदर्शनास आणतानाच शहरी भागातील मतदारांची अनास्था हा चिंतेचा विषय असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. पोलिस व महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्याचे सांगूनही त्यांच्या बदल्या का करण्यात आल्या नाहीत, अशी विचारणाही आयोगाने राज्य सरकारला केली. तीन वर्षांपेक्षा अधिक काळ एकाच पदावर व गृह जिल्ह्यातील अधिकाऱ्यांची कोणताही अपवाद न करता तात्काळ बदली करण्यात यावी, असे निर्देश राज्याच्या मुख्य सचिवांना देण्यात आले होते. २६ नोव्हेंबरला विधानसभेची मुदत संपणार आहे तत्पूर्वी निवडणूक होईल, असे निवडणूक आयोगाने म्हटले आहे.

अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्याचे व याबाबतचा अहवाल सादर करण्याचे निर्देश निवडणूक आयोगाने दिले होते; परंतु तीन वेळा स्मरणपत्र पाठवूनही अहवाल सादर न केल्याबद्दल निवडणूक आयुक्तांनी मुख्य सचिवांकडे तीव्र नाराजी व्यक्त केली. राजकीय पक्षाच्या प्रतिनिधींच्या बैठकीत महाराष्ट्रातील सर्व मतदारसंघात एकाच टप्प्यात मतदान घेतले जावे तसेच उमेदवारांसाठी असलेल्या खर्च मर्यादेत वाढ करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली. प्रचार साहित्याचे वाढलेले दर लक्षात घेऊन उमेदवारांच्या खर्चाच्या मर्यादेत २० लाख रुपयांनी वाढ करण्यात यावी, अशी मागणीही करण्यात आली. निवडणुकीत सध्या ४० लाखांची मर्यादा आहे. देशात एकच नियमावली आहे त्यामुळे महाराष्ट्रासाठी वेगळी नियमावली शक्य नाही. खर्चाची मर्यादा देशातील निवडणुकीत समान असते, असे आयोगाने म्हटले आहे. लोकसभा निवडणुकीच्या वेळी मतदान केंद्रावर लांबच लांब रांगा लागल्या होत्या त्यामुळे या वेळी मतदान केंद्राची संख्या वाढवावी. मतदान केंद्रावर अधिक सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशीही सूचना करण्यात आली.

आचारसंहिता भंगाची तक्रार आल्यास दुसरी बाजू ऐकून घेऊनच गुन्हा नोंदवण्यात यावा, अशा मागण्या करण्यात आल्या. निवडणुकीत मतदान केंद्रावर आवश्यक त्या किमान सोयीसुविधा पुरविण्याचे आदेश देतानाच मतदारांची गैरसोय झाल्यास संबंधितांवर कठोर कारवाईचा इशाराही निवडणूक आयोगाने दिला. निवडणूक केंद्रावर निवडणूक कर्मचाऱ्यांसाठी पंखे, आसन व्यवस्था, पिण्याचे पाणी, शेड यासारख्या किमान सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यात याव्यात तसेच मतदारांनी आपल्या बाजूने मतदान करावे म्हणून त्यांना प्रलोभन देण्याचा प्रकार कोणत्याही परिस्थितीत खपवून घेतला जाणार नाही, असा इशारा राजीव कुमार यांनी दिला. राज्यातील राष्ट्रीय पक्ष, राज्य पक्ष अशा एकूण ११ पक्षांच्या नेत्यांशी आयोगाने चर्चा केली. या चर्चेत राजकीय पक्षांनी काही सूचना, हरकती नोंदवल्या. त्यांचा अभ्यास करून योग्य ती कार्यवाही करण्यात येईल, असे राजीव कुमार यांनी स्पष्ट केले. बुथ एजंट हे त्याच भागातील असण्याऐवजी मतदारसंघातील ठेवण्याची मागणी पक्षांनी केली. कुलाबा, कल्याण, पुणे, कुर्ला या मतदारसंघांत जम्मू-काश्मीरपेक्षाही कमी मतदान झाल्याचे आढळून आले आहे त्यामुळे मतदारांनी मतदानासाठी उत्साह दाखवावा. नागरिकांनी आपल्या हक्कासाठी, अधिकारासाठी घराबाहेर पडून मतदान करावे, असे आवाहनही राजीव कुमार यांनी केले आहे. महाराष्ट्रात ९ कोटी ५३ लाख मतदार असून ४ कोटी ६० लाख महिला तर ४ कोटी ९३ लाख ३३ हजार पुरुष मतदार आहेत. १०० वर्षावरील मतदारांची संख्या ४९ हजार आहे. तृतीयपंथी, वृद्ध मतदारांना तसेच दिव्यांग मतदारांसाठी विशेष व्यवस्था करण्यात येणार आहे म्हणजेच आयोगाला मतदान टक्का वाढविण्याची चिंता आहे. पहिल्यांदा मतदान करणाऱ्या मतदारांची संख्याही चांगली आहे. १९.४८ लाख नवीन मतदार आहेत. हे मतदारच लोकशाहीला पुढे घेऊन जातील. देशात लोकसभा निवडणुकीत मतदानाची टक्केवारी समाधानकारक नव्हती. जवळपास अर्ध्याहून अर्धे मतदार मतदानच करत नाहीत.

मतदानाविषयीचा निरुत्साह, सरकारवरील नाराजी यासारख्या विविध कारणांमुळे मतदानाची टक्केवारी घसरते त्यामुळे मतदानाची टक्केवारी वाढणार तरी कशी? असा प्रश्न पडतो. निवडणूक प्रक्रिया हा लोकशाहीतील एक महत्त्वाचा सोहळा आहे म्हणूनच ही प्रक्रिया चोख आणि पारदर्शकपणे राबवली जाणे अतिशय महत्त्वाचे आहे. दुर्दैवाने गत लोकसभा निवडणुकीत राज्यातील काही भागात जो गोंधळ उडाला तो पाहता निवडणूक आयोग या सोहळ्याचे आयोजन करण्याबाबत कितपत गंभीर आहे याची शंका येणे साहजिक आहे. राजकारणाचे गुन्हेगारीकरण होत असल्याचा आरोप आता जुना झाला आहे त्यामुळे मतदारांना मतदारांची गुन्हेगारी पार्श्वभूमी जाणून घ्यायचा हक्क असल्याने प्रत्येक उमेदवाराला उमेदवारी दाखल केल्यानंतर तीन दिवसांच्या आत वर्तमानपत्र आणि टीव्हीवर जाहिरात देऊन त्याच्या विरुद्ध कोणत्या स्वरूपाचे गुन्हे आहेत याची माहिती प्रसिद्ध करावी, हा निवडणूक आयोगाचा नियम स्तुत्य आहे.

लक्ष्मण हाके यांच्यावरील हल्ल्याच्या निषेधार्थ वडीगोद्री येथे रस्तारोको;धुळे-सोलापूर महामार्ग ठप्प

अंबड। प्रतिनिधी

ओबीसी आंदोलक लक्ष्मण हाके यांच्यावर सोमवारी रात्री पुणे येथे झालेला हल्ला आणि बिनबुडाचा आरोप याच्या निषेधार्थ वडीगोद्री येथे ओबीसी समाज बांधवांनी आज दुपारी रस्तारोको आंदोलन करण्यात आले. धुळे ते सोलापूर महामार्गावर टायर जाळून निषेध व्यक्त करण्यात आल्याने वाहतूक ठप्प झाली. यावेळी आंदोलकांनी टायर जाळून महामार्ग रोखून धरला, काही आंदोलकांनी रस्त्यावर काटे टाकून जोरदार घोषणाबाजी केली. धुळे ते सोलापूर महामार्गावर ओबीसी आंदोलकांनी दीडतास रास्तारोको आंदोलन केलं. यावेळी पोलिसांनी हस्तक्षेप करत पुणे येथील घटनेतील आरोपी विरोधात गुन्हा दाखल झालेला असून त्यांच्यावर कडक कारवाई करण्याचं आश्वासन दिल्यानंतर आंदोलकांनी रास्तारोको मागे घेतला. मात्र, या रस्तारोकोमुळे महामार्गावर दोन्ही बाजूने वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या.

लोकहिताची विकास कामे समन्वय ठेऊन तत्परतेने पार पाडा-खा.डॉ.कल्याण काळे

जालना । प्रतिनिधी

ग्रामीण पाणीपुरवठा योजना, प्रधानमंत्री आवास योजना, महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनांसह विविध योजनेंतर्गत मंजूर असणाऱ्या लोकहितांच्या विकास कामांतील सत्यता तपासून पाहा तसेच ती कामे कोणाच्याही दबावाला बळी न पडता समन्वय ठेवून तत्परतेने पार पाडा, असे निर्देश जिल्हा विकास समन्वय व संनियंत्रण समिती (दिशा) चे अध्यक्ष तथा खासदार डॉ.कल्याण काळे यांनी दिले.

जालना जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवनात आज आयोजित 'दिशा' समितीच्या आढावा बैठक पार पडली. यावेळी खासदार डॉ.काळे बोलत होते. बैठकीला सदस्य सचिव तथा जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ, आमदार कैलास गोरंट्याल, आमदार राजेश राठोड, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी वर्षा मीना, निवासी उपजिल्हाधिकारी शशिकांत हदगल, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक सुनिल पठारे, यांच्यासह समिती सदस्य यांची यावेळी उपस्थिती होती. तसेच त्यानंतर जिल्हा अधिकारी कार्यालयातील सभागारात पत्रकार परिषद घेण्यात आली यावेळी बोलताना खासदार कल्याण काळे म्हणाले की जिल्हाधिकारी सोबत आज जिल्ह्यातील विकास कामासंदर्भात बैठक झाली त्या बैठकीमध्ये जिल्ह्यामध्ये अंगणवाडी मार्फत पोषण आहार दिला जातो परंतु किंवा आहार निर्कीष्ट दर्जाचा असून त्याच्या तक्रारी फार मोठ्या प्रमाणात आल्या आहे या संदर्भात जिल्हाधिकारी श्री पांचाळ यांनी तातडीने चौकशी करावी असे आदेश देण्यात आले आहे तसेच श्री खासदार काळे म्हणाली की भोकरदन जाफराबाद तालुक्यामध्ये पाच वर्षाच्या कालावधीमध्ये शेतकऱ्यांना विहिरी मंजूर करण्यात आल्या नाही हा फार मोठा गंभीर विषय आहे याप्रकरणी संबंधित कधी पंचायत समिती गट विकास अधिकारी व जिल्हा परिषद अधिकारी व संबंधित ग्रामसेवक याप्रकरणी यांच्यावरही मोठी कारवाई होणार आहे असेही ते म्हणाले तसेच विहीर मंजूर नाही होण्याचं कारण याला जबाबदार संबंधित भोकरदन चे लोकप्रतिनिधी आहे. तसेच जल जीवन मध्ये मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाल्याचे तिची ही चौकशी करण्याचे जिल्हाधिकारी यांना सूचना केले आहे. अंबड तालुक्यातील हस्त पोखरी रस्त्याची चौकशी करण्यात येणार आहे. काजळा ते सोयगाव रस्त्यावर कामासाठी टाकलेले मटेरियल संबंधित गुत्तेदारांनी काम सुरू न करता उचलून घेऊन गेले तिचीही चौकशी करावे असे आदेश खासदार श्री काळे यांनी दिले आहे या पत्रकार परिषदेमध्ये आमदार राजेश राठोड, काँग्रेस जिल्हाध्यक्ष राजाभाऊ देशमुख, आमदार कैलास गोरंट्याल यावेळी यांची पत्रकार परिषद मध्ये उपस्थिती होती. लोकहिताची विकास कामे करतांना प्रशासकीय अधिकाऱ्यांनी लोकप्रतिनिधींच्या कुठल्याही दबावाला बळी न पडता जिल्ह्यातील ग्रामीण रस्त्यांच्या कामासह इतरही कामे तातडीने सुरु करुन वेळेत पुर्ण करावीत. ग्रामीण रस्ते हे गावातील गावकरी व शेतकऱ्यांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे रस्ते असून त्यांच्यासाठी ही कामे प्राधान्याने पूर्ण करण्याच्या सूचना खासदार डॉ.काळे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या. जिल्ह्यातील ग्रामीण पाणी पुरवठा योजनेतील कामामध्ये बराच कालावधी उलटल्यानंतरही कोणतीच प्रगती झाली नसून, या कामांमध्ये होत असलेल्या दिरंगाईबद्दल खासदार डॉ.काळे यांनी संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांबाबत नाराजी व्यक्त केली. तसेच या योजनेतंर्गत काही गावात झालेल्या कामांची गुणवत्ता तपासणी करण्यात यावी, असे आदेशही त्यांनी दिले. प्रधानमंत्री आवास योजनेतील शहरातील व ग्रामीण भागातील दिल्या जाणाऱ्या अनुदानाच्या फरकाबाबत प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश त्यांनी दिले.

पान १वरून...

महाराष्ट्रातील पूरग्रस्तांसाठी केंद्राचे

आंध्र प्रदेशला १ हजार ३६ कोटी, आसामला ७१६ कोटी, बिहारला ६५५.६० कोटी, गुजरातला ६०० कोटी, पश्चिम बंगालला ४६८ कोटी, तेलंगणाला ४१६.८० कोटी, हिमाचल प्रदेशला १८९.२० कोटी, केरळला १४५.६० कोटी निधी जारी केला आहे. याव्यतिरिक्त मिझोरामला ५० कोटी, नागालँडला २१.६० कोटी, सिक्कीमला १९.२० कोटी, त्रिपुराला २५ कोटी देण्यात आले आहेत. या राज्यांना यावर्षी मान्सूनमध्ये अतिवृष्टी, पूर आणि भूस्खलनाचा फटका बसला आहे. याव्यतिरिक्त, केंद्र सरकार लवकरच बिहार आणि पश्चिम बंगालमध्ये पूर नुकसानीचे मूल्यांकन करण्यासाठी पथके पाठवणार आहे. या दोन्ही राज्यांना नुकताच पुराचा फटका बसला आहे. पथकांचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर अतिरिक्त आर्थिक मदत या राज्यांना मंजूर केली जाईल.

शेतकऱ्यांचा उद्या देशव्यापी

पंढेर यांनी माहिती देताना सांगितले की, शंभू सीमेवर सुरू असणाऱ्या आंदोलनाच्या बळकटीसाठी ३ ऑक्टोबर रोजी देशभरात २ तास रेल्वे रोको आंदोलन केले जाईल. दुपारी १२.३० ते २.३० या वेळेत हे रेल्वे रोको केले जाईल. रेल्वे ट्रॅकवर दोन तास शेतकरी आंदोलन करतील. यामुळे रेल्वे सेवेवर परिणाम होऊ शकतो. यावेळी प्रवाशांनी थोडा शेतकऱ्यांच्या बाजूने विचार करावा, असेही पंढेर यांनी म्हटले आहे.

माजलगावची जागा राष्ट्रवादीलाच

सर्वांनाच न्याय देण्याचा प्रयत्न राज्य सरकार करत आहे.लोकांच्या आरोग्यालाही तेवढेच महत्व दिले जात असुन आरोग्य सेवेवरील रक्कम वाढवली असुन त्यामध्ये २४५० कोटी रूपये सरकार खर्च करत आहे. समाजातील प्रत्येक घटकापर्यंत विकासाच्या योजना कशा पोहचतील यासाठी आम्ही कटीबध्द आहोत असे त्यांनी सांगितले.राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष हा सातत्याने काम करत राहणारा पक्ष आहे असा विश्वास मी तुम्हाला देतो असेही त्यांनी सांगितले. माजलगाव विधानसभा मतदार संघाची जागा ही राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचीच असेल असा दावाही त्यांनी यावेळी केला. माजलगावात पाणी पुरवठा योजना पूर्णत्वास नेण्यात आली.आरोग्य केंद्राचं बांधकाम प्रगतीपथावर आहे. विकासकामांसाठी आमदार प्रकाश सोळंके हे सतत पाठपुरावा करत आले आहेत. माजलगावात धरणाच्या कामासाठी निधी दिला. रस्ते, पूल, रेल्वे यांसाठी निधी उपलब्ध करून दिला. कांदा, सोयाबीन, कापसाला भाव वाढवून देण्यात आला आहे. माझा शेतकरी सुखी तर आपण सगळेच सुखी राहू. काळ्या आईची सेवा करणारी आपण माणसं आहोत. ऊसाला एफआरपी वाढवून देण्यासाठी केंद्राकडे पाठपुरावा आम्ही केला. ऊस तोडणी कामगारांच्या हितासाठी गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार महामंडळ स्थापन करण्यात आलं आहे.या महामंडळाच्या माध्यमातून ऊसतोड कामगारांना भरीव मदत करण्यात आली. शिव-शाहू-फुले-आंबेडकरांच्या विचारधारेवर राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष चालत आहे. शासकीय योजनांची माहिती देण्यासाठी आम्ही राज्यभरात जनसन्मान यात्रा काढली आहे. सर्व समाज घटकांच्या सर्वांगीण विकासासाठी हे राज्य सरकार प्रयत्नशील आहे. सर्व जाती, धर्म, प्रांत, भाषिक, अल्पसंख्याक आदींना सोबत घेऊन चालणारं हे सरकार आहे.माझी लाडकी बहीण योजना आम्ही आणली आणि काबाड कष्ट करणाऱ्या माझ्या लाखों बहिणींच्या बँक खात्यात पैसे जमा केले. मुलींना शिक्षण मोफत केलं. शेतकऱ्यांना वीज बिल माफी दिली. एक रुपयात पीक विमा योजना देऊ केली. दुधावर प्रतिलिटर ७ रुपये अनुदान आम्ही दिलं. सरपंच, उपसरपंच, पोलीस पाटील, कोतवाल, आशा सेविका, गट प्रवर्तक आदी सर्वांचं मानधन आम्ही वाढवलं. सर्व शासकीय योजना आणि सर्व सेवा आम्ही पुढची पाच वर्षे सूरूच ठेवू. मात्र एकच विनंती आहे की, यंदाच्या विधानसभा निवडणुकीत महायुतीला भक्कम पाठबळ द्या, आशीर्वाद द्या. असे अजित पवार म्हणाले.

संस्थाचालक, सचिवाचा अटकपूर्व

संस्थाचालक आणि सचिव या दोघांना अजून अटक का झालेली नाही, असा सवाल न्यायमूर्तींनी केला. राज्याचे महाधिवक्ता बिरेंद्र सराफ म्हणाले, ''या प्रकरणात दोन आरोपपत्र दाखल आहेत. संस्थाचालकांचा अटकपूर्व जामिनाचा अर्ज सत्र न्यायालयाने फेटाळला असून त्यांनी यावर उच्च न्यायालयात अपील केलेले आहे. सराफ यांच्या या माहितीवर न्यायमूर्तींनी ताशेरे ओढले. ''या दोन लोकांना अजून अटक का केलेली नाही. तुम्ही यांना अटकपूर्व जामीन मिळण्याची वाट पाहात आहात का?'' असा सवाल न्यायमूर्तींनी केला. तसेच या सुनावणी वेळी विशेष तपास पथकाचे प्रमुख उपस्थित नसल्याबद्दल न्यायालयाने नाराजी व्यक्त केली. या प्रकरणी पुढील सुनावणी आता २३ ऑक्टोबरला होणार आहे.

अंबाजोगाई सहकारी साखर

ताळेबंद पत्रक नफा-तोटा पत्रक तसेच सन २०२३-२०२४ वर्षाचा अर्थसंकल्प इत्यादी आपल्यासमोर सादर करीत आहे. अहवाल काळात कारखाना बंद होता व तो भाडे तत्वावर मे.व्यंकटेश इंडस्ट्रीज लि.परळी-वैजनाथ यांना चालविण्यास दिला होता. परंतु, त्यांनी सदर कारखाना भाडे तत्वावर चालविण्यास आमची कंपनी असमर्थ आहे. असे लेखी कळविले आहे. यामुळे सध्याच्या विद्यमान संचालक मंडळाने राज्य शासन, केंद्र शासनाकडे पाठपुरावा करून हा कारखाना चालु करणे करीता मार्जीन मनी खेळते भांडवल ८० कोटी रूपये मंजुर करून घेणे बाबत परिश्रम घेतले व शासन निर्णयाप्रमाणे आपल्या कारखान्यास मंजुर करण्यात आले. याबाबत कारखाना राज्य शासन केंद्र शासन यांचा अत्यंत आभारी आहे. आपल्या कारखान्यास आर्थिक मदत करण्याकरिता महाराष्ट्राचे सन्माननिय मुख्यमंत्री एकनाथराजी शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, कृषिमंत्री व बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना.धनंजयजी मुंडे, राष्ट्रीय सहकारी संघ, नवी दिल्ली यांचे चेअरमन हर्षवर्धनजी पाटील व आमदार पंकजाताई मुंडे यांचे मी सर्व संचालक मंडळाच्या वतीने जाहीर आभार मानतो. या सर्व मान्यवर नेत्यांनी आपणांस मोलाचे सहकार्य केले आहे. याबद्दल वरील सर्व मान्यवरांचे मनःपूर्वक आभार मानतो. तसेच प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष सहकार्य, मार्गदर्शन करणारे राज्याच्या मंत्रीमंडळातील सर्व सन्माननिय सदस्य, राज्याचे सहकार सचिव, खासदार, आमदार, साखर आयुक्त, प्रादेशिक सहसंचालक (साखर), साखर संघाचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, कार्यकारी संचालक, सरव्यवस्थापक तसेच बीड जिल्ह्याचे जिल्हाधिकारी, उपजिल्हाधिकारी, जिल्हा निबंधक, सहाय्यक निबंधक, जिल्हा पोलीस प्रमुख, तहसिलदार, सर्व शासकीय कार्यालयाचे अधिकारी व बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे व्यवस्थापक, नगरपरिषद अंबाजोगाईचे मुख्याधिकारी व अधिकारी, शासकीय लेखापरिक्षक, अंतर्गत लेखापरिक्षक यांचे ही संचालक मंडळाच्या वतीने आभार मानतो. आजच्या वार्षीक सर्वसाधारण सभेच्या निमित्ताने मी आपल्या कार्यक्षेत्रातील ऊस उत्पादकांना विनंती करतो की, हंगाम २०२४-२५ करीता ऊसाची मोठ्या प्रमाणावर लागवड करावी. कारण, या वर्षी पर्जन्यमान चांगले असून, मांजरा धरण शंभर टक्के क्षमतेने भरले आहे. मोठ्या प्रमाणावर ऊसाची लागवड करून आपल्या कारखान्यास ऊस गाळपाकरीता पुरविण्यात यावा अशी विनंती व आवाहन चेअरमन रमेशराव आडसकर यांनी केले. तसेच ४७ वा वार्षीक अहवाल आपल्या समोर सादर केलेला असून, कारखान्याचे सर्व संबंधीत सभासद, संचालक मंडळ सदस्य, अधिकारी, कर्मचारी, तोडणी वाहतुक कामगार, व्यापारी वर्ग, पत्रकार बांधव मित्र, हितचिंतक यांनी जे आपले अनमोल सहकार्य केले. या बद्दल ही पुनःश्च सर्वांचे मनपूर्वक आभार मानतो. असे चेअरमन आडसकर यांनी सांगितले. प्रारंभी व्हाईस चेअरमन दत्तात्रय पाटील यांनी अंबाजोगाई सहकारी साखर कारखाना सचोटीने, चांगल्या पद्धतीने चालविण्यासाठी संचालक मंडळ तयार आहे, मांजरा धरण भरल्याने पुढील दोन-तीन वर्षे ऊस कमी पडणार नाही. कारखान्याला गतवैभव मिळवून देवूत, गरजेप्रमाणे मनुष्यबळ वापरले जाईल. अर्थसहाय्य उपलब्ध करून दिल्याबद्दल कृषिमंत्री व बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना.धनंजयजी मुंडे यांना व्हाईस चेअरमन पाटील यांनी धन्यवाद दिले. सभेच्या सुरूवातीला कार्यकारी संचालक डि.एन.मरकड यांनी नोटिस वाचन केले. विषयपत्रिकेवरील विषयांवर मांडणी करून उपस्थित सभासदांनी टाळ्यांच्या गजरात मान्यता द्यावी असे आवाहन केले. त्यांच्या आवाहनाला उपस्थित सभासदांनी टाळ्यांच्या गजरात मान्यता दिली. या सर्वसाधारण सभेच्या वेळी अंबाजोगाई सहकारी साखर कारखान्याचे संचालक ऍड.प्रमोद जाधव, ऋषिकेश आडसकर, संभाजी इंगळे, लक्ष्मीकांत लाड, अशोक गायकवाड, गोविंद देशमुख, राजाभाऊ औताडे, विजय शिनगारे, बाळासाहेब सोळंके, मधुकर शेरेकर, अनिल किर्दंत, जिवन कदम, लालासाहेब जगताप, अनंत कातळे, विठ्ठल देशमुख, शशिकांत लोमटे, मनाज युसुफखाँ पठाण, रमाकांत पिंगळे, श्रीमती भागिरथी साखरे, श्रीमती वच्छलाबाई शिंदे, एस.बी.साखरे, कार्यकारी संचालक दत्तात्रय मरकड यांच्यासह केज कृ.उ.बा.समितीचे सभापती अंकुशराव इंगळे, अंबाजोगाई कृ.उ.बा.समितीचे माजी सभापती विलासराव सोनवणे, धारूर कृ.उ.बा.समितीचे उपसभापती सुनील शिनगारे, लातूर जिल्हा परिषदेचे माजी सदस्य साहेबराव पवार, उध्दवराव इंगोले, अजय (चिमू) पाटील, शिवाजीराव मायकर, रमेश नखाते, धारूर पंचायत समितीचे माजी सभापती विलास खुळे, ऍड.बालासाहेब इंगळे, रामकिसन खोडसे, अजित गरड, रणजित लोमटे, शिंदे मामा, बाळासाहेब देशमुख, अनिल माचवे यांच्यासह सर्वपक्षीय नेते, पदाधिकारी व कार्यकर्ते आणि बहुसंख्येने सभासद, ऊस उत्पादक शेतकरी, कारखान्याचे खातेप्रमुख, अधिकारी, कर्मचारी, पत्रकार उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन सरपंच रविकिरण देशमुख यांनी केले. तर उपस्थितांचे आभार संचालक राजेभाऊ औताडे यांनी मानले. अत्यंत खेळीमेळीच्या वातावरणात अंबाजोगाई सहकारी साखर कारखान्याची ४७ वार्षिक सर्वसाधारण सभा संपन्न झाली.

वैद्यकीय महाविद्यालयाचे श्रेय घेण्यावरून

विकास कामांची यादीच आमदार गोरंट्याल यांनी सांगितली आणि माजी मंत्री अर्जुनराव खोतकर यांच्यावर टीका केली. त्यानंतर घेतलेल्या पत्रकार परिषद मध्ये माजी मंत्री अर्जुनराव खोतकर म्हणाले की, राज्यामध्ये व केंद्रात आमचे सरकार आहे. लवकर मंजुरी मिळण्यासाठी मी प्रयत्न केल्यामुळे वैद्यकीय महाविद्यालयाला लवकर मंजुरी मिळाली. तसेच श्री अर्जुनराव खोतकर म्हणाले की, आमच्याच बातम्या चोरून पेपरला द्यायच्या आणि छापून आणायच्या असा धंदा आम्ही करत नाहीत आणि ती सवय पण नाही. परंतु काही लोक आयत्या बिळावरचे नागोबा झाले आहेत असाही टोला त्यांनी आ.कैलास गोरंट्याल यांना लगावला. यावेळी माजी मंत्री अर्जुन खोतकर यांच्या पत्रकार परिषदेमध्ये भास्कर पाटील दानवे, भाऊसाहेब घुगे, राजेश राऊत, अशोक पांगरकर यांची उपस्थिती होती. याबाबत भास्कर पाटील दानवे म्हणाले, जालना जिल्ह्याच्या विकासाच्या कामांची सुरूवात माजी खासदार रावसाहेब दानवे यांनी केली. जे जे प्रकल्प हाती घेतले होते ती सर्व कामे आज पुर्णत्वाला जात आहेत. यासाठी आजही दानवे सरकारी दरबारी जातात आणि कामे पूर्ण कशी होतील याचा प्रयत्न करतात. त्यांनी आपल्या जिल्ह्यासाठी मेडिकल कॉलेज मागील वर्षीच मंजूर करुन घेतले होते. ते याच वर्षापासून चालू करण्यासाठी मागील आठवड्यात दिल्ली येथे ना. जे पी नड्डा यांची भेट घेऊन हा विषय त्यांच्या समोर मांडला. नड्डा यांनी लगेच आरोग्य खात्यामधील प्रमुख अधिकाऱ्यांची बैठक घेऊन जालन्याच्या मेडिकल कॉलेजसह राज्यातील भंडारा, वाशीम, हिंगोली, अमरावती, गडचिरोली, बुलढाणा, अमरनाथ येथील कॉलेजला मान्यता देऊन प्रत्येकी १०० सीट्स मंजूर केल्या. या शिवाय नाशिक व जीटी हॉस्पिटलसाठी प्रत्येकी ५० सीट्स अश्या एकूण ९०० जागांना मंजुरी दिली. जालन्याच्या मेडिकल कॉलेज मुळे इतर ९ जिल्ह्यातील मेडीकल कॉलेजचा प्रश्न दादांमुळे चुटकी सरसी सोडविला गेला. तसेच या वर्षीपासून जालन्यातील मेडिकल सुरु होण्याचा मार्ग मोकळा झाला. असे असतानाही खासदार काळे हे विकासात केंद्राचा अडथळा येत असल्याचे म्हणतात. त्यांचे असे म्हणणे चुकिचे आणि लांच्छनास्पद असून, त्यांना कोणता अडथळा आणला गेला हे त्यांनी चॅलेंजवर सांगावे, असे आवाहन भास्कर पाटील दानवे यांनी म्हटले.

बीडच्या जिल्हा शल्य

बाबतीमध्ये बरेच आरोप प्रत्यारोप करण्यात आले. एकंदरीत त्यांचा कार्यकाळ हा काही प्रमाणात वादग्रस्त ठरला. त्यांची परभणी येथे बदली झाली असून त्यांच्या जागी जिल्हा शल्य चिकित्सक म्हणून डॉक्टर अशोक थोरात यांची नियुक्ती करण्यात आली आहे. यापूर्वी सुद्धा डॉ. थोरात यांनी बीड जिल्हा शल्यचिकित्सक म्हणून यशस्वीरित्या कार्य केले आहे. मंगळवारी त्यांनी डॉ. बडे यांच्याकडून पदभार स्वीकारला असून जिल्हा रुग्णालयाची त्यांनी पाहणी करून कामकाजाला सुरुवात सुद्धा केली आहे. जिल्हा रुग्णालयासह स्वाराती रुग्णालय व जिल्ह्यातील वैद्यकीय सेवा सुधारण्याचे त्यांच्यासमोर आव्हान आहे. मात्र यापूर्वी त्यांनी बीड जिल्हा शल्य चिकित्सक म्हणून उत्कृष्ट कार्य केल्याने जिल्ह्यातील वैद्यकीय सेवा ते काही दिवसातच सुरळीत करतील, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

अनधिकृत बांधकामे धर्म पाहून

आपला निकाल राखून ठेवला. जोपर्यंत या खटल्याचा निकाल येत नाही, तोपर्यंत बुलडोझर कारवाईवरील अंतिरम बंदी कायम ठेवण्याचा निर्णय सर्वोच्च न्यायालयाने घेतला. अनधिकृत बांधकामे पाडण्यासाठी जी मार्गदर्शक तत्त्वे निश्चित केली जातील. ती संपूर्ण भारतासाठी आणि सर्व धर्मांसाठी लागू असतील, असे यावेळी न्यायालयाने सांगितले. न्यायमूर्ती बी. आर. गवई आणि के. व्ही. विश्वनाथन यांच्या खंडपीठासमोर सुनावणी पार पडली. सर्वोच्च न्यायालयाची परवानगी न घेता, आरोपीची मालमत्ता बुलडोझर कारवाई करुन पाडण्यावर बंदीचे अंतरिम आदेश १७ सप्टेंबर रोजी देण्यात आले होते. सर्वोच्च न्यायालयाचा हा अंतरिम आदेश खटल्याचा निकाल लागेपर्यंत सुरु राहील, असे न्यायालयाने मंगळवारी सांगितले. अनधिकृत बांधकाम हटवण्यासाठी आवश्यक असणारी कारवाई करण्यास हा आदेश लागू होणार नसल्याचेही न्यायालयाने स्पष्ट केले आहे. न्यायालयाच्या आदेशाचे पालन न करणाऱ्यांवर कारवाई करण्यात येईल, असेही खंडपीठाने स्पष्ट केले. याशिवाय, पीडितांची मालमत्ता परत केली जाईल, त्याची नुकसानभरपाईही दोषी अधिकाऱ्यांकडून वसूल केली जाईल. सुनावणीवेळी न्यायालयाने सुचवले की, प्रस्तावित बुलडोझर कारवाईमुळे भावित होणाऱ्यांची माहिती देण्यासाठी आणि केलेल्या कारवाईची व्हिडिओग्राफी करण्यासाठी एक ऑनलाइन पोर्टल असावे. सर्वोच्च न्यायालयाने जारी केलेले निर्देश संपूर्ण भारतात लागू होतील आणि ते कोणत्याही विशिष्ट समुदाय किंवा धर्मापुरते मर्यादित नसतील, असेही खंडपीठाने स्पष्ट केले आहे.

अतिक्रमण असल्यास काहीही असो हटविले जाईल

सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे, आपला देश धर्मनिरपेक्ष आहे. न्यायालयाची मार्गदर्शक तत्त्वे सर्व नागरिकांसाठी असतील. बेकायदा बांधकाम हिंदू किंवा मुस्लिम कोणीही करू शकत नाही. धर्म किंवा समुदायाचा विचार न करता, न्यायालयाच्या सूचना प्रत्येकासाठी असतील. सार्वजनिक रस्ते, फूटपाथ, जलवाहिनी. रेल्वे मार्ग यांपैकी कुठेही अतिक्रमण असेल तर ते हटवावे लागेल, असे न्यायालयाने म्हटले आहे. रस्त्याच्या मधोमध कोणतीही धार्मिक वास्तू असेल, मग ती गुरुद्वारा, दर्गा किंवा मंदिर काहीही असो, ती हटवली जाईल, असे न्यायालयाने म्हटले आहे. कोणतीही बांधकामे पाडण्यासाठी दिलेल्या आदेशांवर न्यायालयीन देखरेख आवश्यक असल्याचे निरीक्षणही न्यायालयाने नोंदवले.

राहुल गांधी चार, पाच ऑक्टोबर

येथे छत्रपती शिवाजी महाराजांच्या भव्य पुतळ्याचे अनावरण राहुल गांधी यांच्या हस्ते होणार आहे. ५ ऑक्टोबर रोजी सकाळी राहुल गांधी हे राजर्षी शाहू समाधी स्थळाला भेट देऊन अभिवादन कर

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
बुधवार दि.०२ ऑक्टोबर २०२४

मराठी पत्रकार परिषदेच्या पाटोदा तालुका अध्यक्षपदी अजय जोशी, उपाध्यक्षपदी अशोक भवर, सचिवपदी हमिदखान पठाण यांची निवड

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस.एम.देशमुख सर,किरण नाईक सर,परिषदेचे प्रदेश अध्यक्ष मिलिंद आष्टीकर,डिझीटल मिडीया प्रदेश अध्यक्ष अनिल वाघमारे, यांच्या आदेशावरून जिल्हाध्यक्ष विशाल साळुंके, छगन मुळे,विलास डोळसे,यांनी पाटोदा तालुकाध्यक्ष पदी अजय जोशी यांची निवड

केली तर उपध्यक्ष पदी अशोक भवर,तर सचिव पदी हमिदखान पठाण यांची निवड जाहीर केली. या निवडीबद्दल त्यांचे परिषदेचे मुख्य विश्वस्त एस एम देशमुख सर ,राज्य कार्यकारिणी सदस्य विलास डोळसे, जिल्हा अध्यक्ष विशाल सोंळुके, कोषाध्यक्ष छगन मुळे,मराठी पत्रकार परिषदेचे जिल्हा उपाध्यक्ष अविनाश कदम, जेष्ट पत्रकार इद्रिस चाऊस,राष्ट्रवादी विधी सेल प्रदेश अध्यक्ष ॲड नरसिंह जाधव, अबलुक घुगे, सुहास जाधव, तालुका पत्रकार हल्ला विरोधी कृती समितीचे अध्यक्ष संजय सानप ,सचिन पवार,डिंगाबर नाईकनवरे,जावेद शेख,फय्याज सय्यद,सचिन गायकवाड, सोमनाथ खंडागळे,दयानंद सोनवणे,श्रीरंग लांडगे,कॉ महादेव नागरगोजे,नगरसेवक सुशील कवठेकर,मुळे,आदींनी अभिनंदन केले आहे.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाने महाकवी वामनदादा कर्डक यांना डिलीट पदवी द्यावी -प्रा.डॉ.जाधव

जयंतीनिमित्त सुप्रसिद्ध गायक मनोजराजा गोसावी आणि गायिका धम्मदिक्षा वाहुळे यांच्या भीमगीतांनी विचारांचा जागर

अंबाजोगाई । प्रतिनिधी

येथील लोकशाहीर वामनदादा कर्डक कला अकादमी, अंबाजोगाई यांच्या वतीने महाकवी वामनदादा कर्डक यांच्या १०२ व्या जयंतीनिमित्त वामनदादा यांच्या सहवासातील मान्यवरांना पुरस्कार देऊन त्यांचा यथोचित सत्कार आणि यवतमाळ येथील सुप्रसिद्ध कवी, गायक मनोजराजा गोसावी आणि धम्मदिक्षा वाहुळे यांचा भीम गीत गायन कार्यक्रम रविवार, दिनांक २९ सप्टेंबर २०२४ रोजी आद्यकवी मुकूंदराज सांस्कृतिक सभागृह, नगरपरिषद कार्यालय परिसर, अंबाजोगाई येथे आयोजित करण्यात आला होता.

महाकवी वामनदादा कर्डक यांच्या जयंतीनिमित्त दादांनीच गायिलेल्या बुद्ध-प्रबुद्ध गीतांच्या दैदीप्यमान कार्यक्रमाचे व वामनदादांच्या सहवासातील मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ललिताताई घोडके (वामनदादा कर्डक यांची लेक) या होत्या. तर यावेळी डॉ.प्रो.एम.डी.इंगोले (आंबेडकरवादी हिंदी लेखक व वामनदादा कर्डक यांच्या गीतांचे अभ्यासक), प्रा.दिपक जमदाडे (बुलढाणा) या मान्यवरांची प्रमुख उपस्थिती लाभली. या प्रसंगी मनोजराजा गोसावी (यवतमाळ) यांना सामाजिक कार्यकर्ते लक्ष्मणराव घोडके यांच्या स्मृतिप्रित्यर्थ २०२४ सालचा लोककवी वामनदादा कर्डक पुरस्कार आणि प्रा.डॉ.सागर जाधव, यवतमाळ (संपादक व प्रकाशक, वामनदादा कर्डक समग्र वाङ्मय खंड १ ते १६) यांना आयु.देवदास भाऊ सोनवणे यांच्या स्मृतिप्रित्यर्थ २०२४ सालचा लोककवी वामनदादा कर्डक पुरस्कार प्रदान करण्यात आले. तसेच प्रा गौतम गायकवाड लिखित ''लोककवी वामनदादा कर्डक यांच्या गीतातील महान स्त्री पुरूष व्यक्तिरेखा'' या पुस्तकाचे प्रकाशन मान्यवरांच्या उपस्थित करण्यात आले. कार्यक्रमाची सुरूवात वंदन माणसाला या जगन बापू सरवदे यांनी सादर केलेल्या स्वागतगीताने झाली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना प्रा.गौतम गायकवाड यांनी बुद्ध-फुले-शाहू-आंबेडकर यांचे प्रवर्तनवादी विचार गीत,

संगीत, गायनाच्या माध्यमातून ज्यांनी जिथे गांव, तिथे भीमाचे नांव पोहोंचवणारा, भीमसा कौन बडा है, बताओ इस धर्तीपर, कोई नहीं. एक नया आंबेडकर पैदा हो यासाठी आयुष्यभर भीमाईचे गीत गात संपूर्ण जीवन जगलेले वामनदादा कर्डक यांचा दिर्घ सहवास अंबाजोगाईच्या भूमीला लाभला.

अशा या महाकवीच्या जयंतीनिमित्त हा प्रबोधनपर कार्यक्रम आयोजित केला असल्याचे चळवळीला गीतातून दिशा देणाऱ्या महाकवी वामनदादा कर्डक यांना डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाने डिलीट ही मानद पदवी द्यावी अशी मागणी प्रा.डॉ.जाधव यांनी यावेळी केली. सत्काराला उत्तर देताना डॉ.प्रो.एम.डी.इंगोले म्हणाले की, दादांनी वंदनीय बाबासाहेबांना गीतांतून विविध नावांनी संबोधले आहे. मानवी मुल्यांचा विचार करणारी अनेक प्रतिके वापरली आहेत. दादांच्या कविता आणि गीतांतून क्रांतीची मशाल तेवत राहीली असल्याचे डॉ.प्रो.इंगोले यांनी सांगितले. अध्यक्षीय समारोप करताना ललिताताई घोडके यांनी आपण दादांची लेक आहोत असे सांगून एका चालत्या बोलत्या विद्यापीठात आपली जडणघडण झाल्याचे नमूद करून ललिताताई यांनी दादांच्या अनेक आठवणी कथन केल्या. यावेळी बळीराम उपाडे, महादेव भालेराव कु.भुतकर, प्रा. रमेश सरवदे, कु.सरकटे स्वितम इंगळे, अमोल तरकसे डॉ एम एच कांबळे यांनी दादांची विविध गिते सादर केली. यानंतर मनोजराजा गोसावी (यवतमाळ) आणि धम्मदिक्षा वाहुळे यांनी मी बुध्द गयेचा वारा, रमा तू मला क्षमा कर, नीच नितीचा कापू गळा वादळ वारा यांसारख्या एकापेक्षा एक सरस, जोश पूर्ण, प्रबोधनपर गीतं गावून उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. याप्रसंगी दादांच्या सहवासातील स्थानिक कलावंत जगन सरवदे, डि.एन.आचार्य, बलभीम तरकसे, शाहीर गौतम सरवदे तसेच परीवर्तनवादी चळवळीतील लेखक प्रा.गौतम गायकवाड यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करून उपस्थितांचे आभार राहुल सुरवसे यांनी मानले. या कार्यक्रमासाठी अंबाजोगाई शहर व परिसरात ज्येष्ठ नागरिक, विविध क्षेत्रातील मान्यवर, युवक, महिला यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी जयंती उत्सव समितीच्या वतीने प्रमुख गायक राहुल सुरवसे, भीमशाहीर गौतम सरवदे, गायक महादेव भालेराव, प्रा.गौतम गायकवाड, जगन सरवदे, , अकादमीचे अध्यक्ष शंकर लोंढे, महादेव माने, रमाकांत वाव्हळे, डि.एन.घोबाळे, गायक बळीराम उपाडे, आकाश वेडे यांनी पुढाकार घेतला होता.

आधारभुत किंमत खरेदी योजनेसाठी शेतकऱ्यांनी ऑनलाईन नोंदणी करण्याचे आवाहन

बीड । प्रतिनिधी

सर्व शेतकरी बांधवाना सुचित करण्यात येते की, खरीप हंगाम २०२४-२५ मध्ये बीड जिल्हयात आधारभुत किंमत खरेदी योजने अंतर्गत नाफेड मार्फत तालुकानिहाय १६ केंद्रावर मुग, उडीद व सोयाबीन या पिकाची ऑनलाईन शेतकरी नोंदणी दिनांक ०१ ऑक्टोबर २०२४ पासून सूरु झाली आहे. मुग, उडीद खरेदी दिनांक १० ऑक्टोबर २०२४ पासून व सोयाबीन खरेदी दिनांक १५.१०.२०२४ पासून शासनाच्या आदेशानुसार खरेदी सुरु करण्याचे आदेश प्राप्त झालेले आहेत. तरी शेतकऱ्यांनी आपल्या जवळच्या खरेदी केंद्रावर स्वत: जावून ऑनलाईन नोंदणी करावी करण्याचे आवाहन जिल्हा पणन अधिकारी यांनी केले आहे.

नोंदणीसाठी आपले आधारकार्ड, राष्ट्रीयकृत बँकेचे छापील पासबुक (अकाउंट नंबर व आय.एफ.एस.सी. कोड स्पष्ट दिसावा) ऑनलाईन पीक पेरा असलेला ७/१२ उतारा घेउन आपल्या पिकाची नोंदणी करावी.

मालाचा प्रकार,नोंदणी कालावधी खरेदी कालावधी

मुग ०१ ते १० ऑक्टोबर २०२४ दि. ०७.०१.२०२५,उडीद ०१.१०.२०२४ पासून दि. १०.१०.२०२४ ते दि. ०७.०१.२०२५,सोयाबीन ०१.१०.२०२४ पासून दि. १५.१०.२०२४ ते दि.१२.०१.२०२५

आधारभूत किंमत:-मूंग ८६८२/- रुपये प्रती क्विंटल उडीद- ७४००/- रुपये प्रती क्विंटल, सोयाबीन- ४८९२/- रुपये प्रती क्विंटल, बीड जिल्हयात १६ खरेदी केंद्राना खालील प्रमाणे मुंग, उडीद, सोयाबीन नोंदणी व खरेदी केंद्र सुरु करण्यात आलेले आहेत.

तालुका खरेदी केंद्राचे ठिकाण,खरेदी केंद्र संस्थेचे नाव:अंबाजोगाई,मोंढा मार्केट यार्ड अंबाजोगाई, अंबाजोगाई तालुका खरेदी विक्री संघ लि.अंबाजोगाई,अंबाजोगाई बर्दापूर किसान कृषी निविष्टा सहकारी संस्था बर्दापुर,अंबाजोगाई घाटनांदूर, आदित्य कृषि निविष्टा सहकारी संस्था मर्या. हनुमंतवाडी अंबाजोगाई,जोगाईवाडी,वसुंधरा फळे भाजीपाला व फुले सहकारी खरेदी विक्री संस्था अंबाजोगाई,आष्टी मार्केट यार्ड कडा,जामगाव सेवा सहकारी सोसायटी लिमिटेड जामगाव,आष्टी शिराळा किसान विकास सर्वसाधारण सहकारी संस्था मर्या.शिराळ बीड बहिरवाडी, भैरवनाथ कृषि निविष्टा सर्वसाधारण सहकारी संस्था बहिरवाडी,बीड चौसाळा यशोदिप बहुउद्धेशिय सर्व सेवा सहकारी संस्था मर्या.साखरे बोरगांव धारुर, मार्केट यार्ड धारुर किल्लेधारुर, तालुका खरेदी विक्री संघ धारुर, गेवराई मोंढा मार्केट यार्ड गेवराई,गेवराई तालुका खरेदी विक्री संघ गेवराई,केज धारुर रोड केज,केज तालुका सहकारी खरेदी विक्री संघ केज,माजलगाव बीड रोड माजलगाव,ॲड. रामराव नाटकर, कृषी निविष्ठा सहकारी संस्था माजलगाव,परळी ब्रंम्हवाडी परळी, परळी वैजीनाथ तालुका सहकारी खरेदी विक्री सघं परळी,पाटोदा मोंढा मार्केट,पाटोदा,पाटोदा तालुका कृषि प्रक्रिया सहकारी संस्था कुसळंब,शिरुर शिरुर सिंदफणा शेतमाल पुरवठा व विक्री सहकारी संस्था मर्या. लोणी,वडवणी महालक्ष्मी बहुउद्धेशिय सर्व सेवा सहकारी संस्था मर्या.

परतीच्या पावसाने दैना उडाली असताना शिवसंग्रामच्या आंदोलनाने शिंदे नगर, गिराम नगर भागातील नागरिकांना दिलासा

बीड । प्रतिनिधी

शहरातील विविध भागातील नागरिक, महिला यांना सोबतीला घेऊन विविध समस्ये संदर्भात बीड शहर शिवसंग्रामने शिष्टमंडळासह महिन्या पूर्वी मुख्यअधिकारी यांना निवेदन देत आंदोलन केले होते. याची दखल घेत नगरपालिकेने शिवसंग्रामच्या शिष्टमंडळाने मांडलेल्या समस्या सोडवल्या असून बीड शहरातील शिंदे नगर, गिराम नगर भागात तात्पुरत्या स्वरूपात मुरूम टाकून रस्त्याची दुरुस्ती केली आहे. मागील काही दिवसात सुरू झालेल्या परतीच्या पावसाने सर्वत्र पाणी आणि चिखलमय रस्ते पहावयास मिळाले परंतु ज्या

भागातील नागरी समस्या संदर्भात शिवसंग्रामने आवाज उठवला होता. त्या ठिकाणच्या रस्त्याची दुरुस्ती झाल्याने या परिसरातील नागरिकांना परतीच्या पावसामुळे शहरातील अन्यत्र झालेल्या गैरसोयीचा सामना करावा लागला नाही.शिवसंग्राम ने केलेल्या या आंदोलनामुळे त्यांना दिलासा मिळाला आहे. त्यामुळे या भागातील नागरिक समाधान व्यक्त करत आहेत.

रस्त्यांची शहरात एवढ्या समस्या असताना मुख्याधिकाऱ्यांना नागरिकांच्या समस्या ऐकून घेण्यासाठी वेळ नाही का? असे म्हणत घोषणाबाजी करत शिष्टमंडळाने मुख्याधिकारी यांच्या कार्यालयातच ठिय्या आंदोलन केल होते. यानंतर नगरपालिकेत शिवसंग्रामच्या अध्यक्ष डॉ. ज्योती विनायकराव मेटे यांनी नगरपालिकेत पाचारण करत मुख्याधिकारी यांना नागरिकांच्या समस्या संदर्भात धारेवर धरले होते. या सर्वांचा परिपाक म्हणून नगरपालिकेने शिवसंग्रामच्या शिष्टमंडळाने सुचवलेल्या समस्या सोडवल्या असून या भागातील नागरिकांना चिखलमय रस्त्यातून प्रवास करण्याची वेळ आली नाही. त्यामुळे नागरिक शिवसंग्राम अध्यक्ष डॉ. ज्योती मेटे यांचे आभार मानत, समाधान व्यक्त केले आहे.

सुधीर मते माझ्या संघटनेचा जिल्हाध्यक्ष, मला त्याचा अभिमान -काळकुटे

पुणे । प्रतिनिधी

ओबीसींच्या हक्कासाठी लढा देणारे लक्ष्मण हाके यांनी मद्यपान केल्याचा आरोप मराठा संघटनांच्या नेत्यांनी केला आहे. हाकेंनी सार्वजनिक ठिकाणी मद्यपान करुन वाद घातल्याचा दावा मराठा तरुणांनी केला होता, या घटनेचा व्हिडीओ देखील व्हायरल झाला आहे. पोलिस ठाण्यामध्ये काही मराठा तरुणांवर गुन्हाही दाखल झाला आहे.

ज्या सुधीर मते यांचं नाव लक्ष्मण हाके वारंवार घेत होते ते सुधीर मते हे राष्ट्रीय छावा संघटनेचे जिल्हाध्यक्ष आहेत. संघटनेचे संस्थापक गंगाधर काळकुटे यांनी मीडियाशी संवाद साधून मतेंचा अभिमान असल्याचं म्हटलंय.बीड येथील गंगाधर काळकुटे यांनी म्हटलं की, अखंड मराठा समाज मनोज जरांगे पाटील आणि युवराज छत्रपती संभाजीराजे यांच्याबद्दल लक्ष्मण हाके यांनी यापूर्वीसुद्धा काही वक्तव्य केलेले आहेत. सुधीर मते हा माझ्या राष्ट्रीय छावा संघटनेचा जिल्हाध्यक्ष आहे त्याचा मला अभिमान आहे. हाके काळे धंदे करतात, ते आम्ही उघडे पाडले आहे.

काळकुटे पुढे म्हणाले की, संभाजीराजे आणि मनोज जरांगे पाटील यांच्यावर आरोप केल्यानंतर आम्ही त्यांना जाब विचारण्यासाठी तिथे गेलो होतो. तू दारू पितो आणि दुसऱ्यांना शिकवतो, असा जाब आम्ही विचारला होता. हाकेंना कुठलाही त्रास दिला नाही, मला अभिमान आहे आमच्या कार्यकर्त्यांनी हे केले आहे.

नेमकं काय घडलं?

लक्ष्मण हाके हे सोमवारी रात्री पुण्यातील कात्रज-कोंढवा रोड परिसरात असताना काही मराठा सामाजातील तरुणांसोबत त्यांचा वाद झाला. माजी खासदार संभाजी छत्रपती यांच्याबाबत हाके यांनी काही दिवसांपूर्वी केलेल्या विधानावर हे तरुण त्यांना जाब विचारण्याचा प्रयत्न करत होते. पण यावेळी हाके यांनी मद्यप्राशन केल्याचा आरोपही या तरुणांनी केला. यातून त्यांच्यामध्ये वाद वाढत गेल्यानं हाके आणि मराठा तरुण हे कोंढवा पोलीस ठाण्यात पोहोचले. याठिकाणी मराठा तरुणांनी हाके यांची वैद्यकीय तपासणी करण्याची मागणी केली आहे. यासंपूर्ण घटनेचा आणि पोलीस ठाण्यातील व्हिडिओ व्हायरल झाला आहे.

वैद्यकीच चाचणी

सोमवारी रात्री मराठा तरुणांनी हाके यांना जाब विचारत त्यांना कोंढवा पोलिस ठाण्यात नेले. येथे मराठा आंदोलकांनी आक्रमक भूमिका घेत हाके यांच्या वैद्यकीय चाचणीची मागणी केली. यानंतर हाके यांची वैद्यकिय चाचणी करण्यात आली.मराठा कार्यकर्त्यांच्या मगणीनंतर लक्ष्मण हाके यांची ससुन रुग्णालयात वैद्यकीय चाचणी केली. या चाचणीच्या प्राथमिक अहवालातून त्यांनी दारु पिलेली नव्हती असा निष्कर्ष डॉक्टरांनी काढला आहे. त्यानंतर आणखी खात्री करण्यासाठी लक्ष्मण हाके यांच्या रक्ताचे नमुने चाचणीसाठी वैद्यकीय प्रयोगशाळेकडे पाठवण्यात आले आहेत. या चाचणीचा अहवाल येण्यासाठी आणखी एक-दोन दिवस लागू शकतात. त्यानंतर हाके यांनी मद्य घेतले होते की नाही ते कळणार आहे.

पान ६ वरून...

एमआयटी विश्वशांती

औचित्याने माईर्स (एम. आय. टी.) विश्वशांती केंद्र पुणे यांना वारकरी संप्रदायातील जुन्या परंपरेतील थोर, जाणकार, मानव कल्याणाचे कार्य करणाऱ्या, पावन घराण्यातील थोर निष्ठावंत अश्या धर्मप्रसारक सत्पुरुषांचा समर्पित जीवन गौरव पुरस्कार देऊन सन्मान करण्यात येत आहे.

ज्या महात्म्याने सद्गुरु बंकटस्वामी परंपरेची सेवा केली. तसेच सद्गुरु जोग महाराज वारकरी शिक्षण संस्थेत विद्यमान परीक्षक या पदावरती कार्य करत संप्रदायाची वैष्णव परंपरा अगदी लहान वयापासून समर्थपणे सांभाळून अद्वैत भक्तीचे तत्व-भजन कथा किर्तने, प्रवचनाच्या माध्यमातून,महाराष्ट्रासह तीर्थक्षेत्रवृंदावन,ऋषिकेश,हरिद्वार,आयोध्या,जगन्नाथ पुरी,रामेश्वर धाम विविध तीर्थक्षेत्रावरती जाऊन अखंड हरिनाम सप्ताह केलें तसेच नारळी सप्ताहाच्या माध्यमातून जनप्रबोधनाचं कामही मोठ्या प्रमाणात केले अनाथ गोरगरीब मुलांचा सांभाळ करून उच्च शिक्षणापर्यंत अध्यात्मज्ञानाबरोबरच शिक्षणाची जोड दिली आज सद्गुरु बंकटस्वामी संस्थान मधील बरीच विद्यार्थी स्वतःच्या पायावरती उभे आहेत याचा श्रेय हे फक्त गुरुवर्य लक्ष्मण महाराज मेंगडे यांना जाते अनेक विद्यार्थी कीर्तन प्रवचन भजन सेवेच्या मध्मातून जनमानसात भक्ती भाव रुजऊन व लोकउध्दारक कार्य करतात अश्या विद्यार्थ्यांच्या गुरू गुरुवर्य महंत लक्ष्मण महाराज मेंगडे यांना ३ ऑक्टोंबर - घटस्थापनेदिनी खास सोहळ्यात विश्वराजबाग लोणी-काळभोर येथे सायंकाळी ६.०० वा. प्रदान करण्यात येत आहे. हा पुरस्कार जाहीर होताच सद्गुरु बंकटस्वामी संस्थानच्या हजारो शिष्य भक्तांनी पेढे वाटून फटाके फोडून आनंदोत्सव जल्लोष साजरा केला.

ऋषिकेश लोमटे यांची बीड

आपल्या विधायक, लोकोपयोगी कार्यातून राज्याचे मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांच्यापर्यंत आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. शिवसेनेतील सर्व ज्येष्ठ नेते, प्रमुख आजी-माजी पदाधिकारी व कार्यकर्ते यांना सोबत घेऊन, स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांमध्ये सहभागी होत पक्ष संघटनेला बळकटी देण्याचे काम ते सातत्याने करीत आहेत. त्यांनी मुख्यमंत्र्यांचा वाढदिवस विविध उपक्रमांचे आयोजन करून राबविला. पक्ष संघटनेच्या बैठकीत, अधिवेशन, वर्धापन दिनी विविध मुद्द्यांवर चर्चा घडवून आणली. समाजातील गरजू लोकांना वैद्यकीय सहाय्यता मदत मिळवून दिली. भव्य मोफत महाआरोग्य शिबिराचे आयोजन करून जनरल, हृदयरोग, नेत्र, एँजीओग्राफी, हाडांचे विकार, बालरोग, मुतखडा यांची तपासणी केली. तसेच मोफत औषधे वाटप केली. शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष व रामहरी राऊत सामाजिक प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने कृत्रिम हात व पाय (जयपुर फूट) यांचे मोफत वाटप शिबीर आयोजित केले. या शिबिराचा लाभ ५०० हून अधिक नागरिकांनी घेतला. असे भव्य आणि नियोजनबद्ध शिबिर मराठवाड्यात प्रथमच आयोजित करण्यात आले होते. असे निमंत्रित मान्यवरांनी स्वतः सांगितले. खेळाडूंसाठी स्पर्धा घेतल्या. शिवजन्मोत्सवासह विनंती महापुरूषांचे जयंती सोहळ्यात सहभागी झाले. शासन आपल्या दारी, लाडकी बहिण योजना मोफत नांव नोंदणी शिबिराचे आयोजन करून प्रभावीपणे राबविली. प्रशिक्षणार्थी डॉक्टर, आशा वर्कर, सफाई कामगार, ऍटो चालक युनियन, सुशिक्षित बेरोजगार, छोटे व्यावसायिक यांच्या प्रश्नांची सोडवणूक केली. याच सर्व विधायक आणि सातत्यपूर्ण कार्याची दखल घेऊन राज्य कक्षप्रमुख रामहरी राऊत यांनी ऋषिकेश आण्णासाहेब लोमटे यांची शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाच्या बीड जिल्हा (केज - धारूर - अंबाजोगाई - परळी) कक्षप्रमुखपदी निवड केली आहे. आपल्या निवडीबद्दल ऋषिकेश लोमटे यांनी मंगेशजी चिवटे, मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी कक्ष प्रमुख तथा विशेष कार्य अधिकारी मुख्यमंत्री, राज्य कक्षप्रमुख रामहरीजी राऊत, शिवसेना जिल्हाप्रमुख सचिनजी मुळूक (बीड) यांचे आभार मानले आहेत. आगामी काळात शिवसेना उपजिल्हाप्रमुख गजानन मुडेगावकर (बीड) व तालुकाप्रमुख अर्जुन वाघमारे यांचे सहकार्य व सोबतीने शिवसेना पक्ष संघटना अधिक बळकट करण्याचा निर्धार व्यक्त केला. तसेच वंदनीय बाळासाहेब ठाकरे शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाचा जिल्हाध्यक्ष म्हणून बीड जिल्ह्यातील केज - धारूर - अंबाजोगाई - परळी या तालुक्यातील जनतेला अहोरात्र मेहनत घेऊन वैद्यकीय सहाय्यता मिळवून देणार असल्याचे लोमटे यांनी आमच्या प्रतिनिधीशी बोलताना सांगितले. ऋषिकेश लोमटे यांच्या निवडीचे सर्वस्तरांतून अभिनंदन व स्वागत होत आहे.

पान ६ वरून...

पवारांची उमेदवारी आणि जरांगे

भाजपचे उमेदवार भीमराव धोंडे यांचा पराभव करत राष्ट्रवादी काँग्रेसचे बाळासाहेब आजबे यांनी विजय मिळवला होता. कसलीही यंत्रणा नसताना केवळ पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे उमेदवार म्हणून त्यांना आमदारकी मिळाली होती. २०१९ ला मोदी लाट असतानाही धोंड्यांचा पराभव झाला होता. केवळ धोंडे यांच्याबद्दलची मतदारात असलेली नाराजी आणि बदल म्हणून मतदारानी आजबे यांना निवडून दिले होते. मात्र त्यांच्याही पाच वर्षाच्या काळात मतदारांच्या अपेक्षा पूर्ण न झाल्याने त्यांच्याबद्दलही मतदारसंघात फारशी सहानुभूती असल्याचे दिसून येत नाही. तसेच त्यांनी शरद पवारांची साथ सोडून अजित पवारांना सोबत गेल्याने पवारांना मानणारा मतदारही नाराज झाले आहेत. तसेच सत्तेसाठी निवडणुकीवेळी पक्ष बदल करणारे अशी प्रतिमा तयार झाली असल्यामुळे जनतेत प्रस्थापित नेत्यांविषयी आता तीव्र नाराजी व्यक्त होत असून नवीन नेतृत्वाची गरज असल्याचे लोक बोलून दाखवत आहेत. मात्र असे असले तरी निवडणुकीसाठी प्रस्थापित नेत्यांचीच नावे पुढे येत आहेत. सत्ताधारी भाजप महायुतीकडून भाजपचे माजी आमदार भीमराव धोंडे, माजी मंत्री सुरेश धस आणि राष्ट्रवादीकडून विद्यमान आमदार बाळासाहेब आजबे हे उमेदवारीसाठी इच्छुक आहेत. तर दुसरीकडे महाविकास आघाडीकडून माजी आमदार साहेबराव दरेकर, महेबुब शेख, ॲड. नरसिंह जाधव, अमोल तरटे, राम खाडे, बापूसाहेब डोके आदी इच्छुक आहेत. यामध्ये ॲड. जाधव सध्या आघाडीवर असल्याचे दिसून येत आहे.दुसऱ्या बाजूला जे लोकसभेला झाले ते विधानसभेला टाळण्यासाठी भाजपचा प्रयत्न आहे. पण विद्यमान आमदार आणि दोन इच्छुक माजी आमदार असे तिन्ही नेते युतीतच आहेत. त्यामुळे मतदारसंघ नेमका कोणाला सुटणार आणि अन्य दोघांना कसे थांबवणार? यातील कोणी बंडखोरी केली तर काय? त्याचे काय परिणाम होणार? याचे वेगळेच टेन्शन आहे. त्याचवेळी महाविकास आघाडीतून शरद पवार हे नव्या चेहऱ्यांना संधी देण्याची शक्यता आहे. बजरंग सोनवणे हे खासदार झाल्याने त्यांच्याही नेटवर्कचा इथे शरद पवार यांना उपयोग होऊ शकतो. शिवाय जरांगे इफेक्टचाही महाविकास आघाडीला फायदा होण्याची चिन्ह आहे. त्यामुळे विधानसभेची निवडणूक चुरशीची होईल असे दिसते.

श्रमाची परिकाष्टा करून

व विद्यार्थ्यांशी असलेला संवाद सतत वाढवण्याचा प्रयत्न असतो त्यातूनच गुणवत्ता सुधारण्याचा प्रयत्न एकत्रितपणे होत असतो व यापुढे यातूनच संस्थेतील महाविद्यालय, संस्कार केंद्र यांच्या प्रगतीचा आलेख वाढत जाणार असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी नॅक मूल्यांकन आढावा बैठकी प्रसंगी, संस्थेचे केंद्रीय कार्यकारणी सदस्य विष्णुपंत कुलकर्णी, उमेश जगताप, मुख्याध्यापक बाबुराव आडे, सिद्धेश्वर सिद्धेश्वर शैक्षणिक संकुलाचे अध्यक्ष सुरेंद्र रेदासणी कार्यवाह ऍडवोकेट विश्वास जोशी महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष अभय कोकड स्थानिक संस्कार केंद्राचे अध्यक्ष, पदाधिकारी, सभासद,प्राचार्य प्रोफेसर सुहास मोराळे, अंबाजोगाई येथील खोलेश्वर शैक्षणिक संकुलाचे अध्यक्ष विजय वालवडकर,कार्यवाह किरण कोदरकर,महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष तथा केंद्रीय कार्यकारिणी सदस्य रामभाऊ कुलकर्णी,प्रभारी प्राचार्य बिभीषण फड,बीड येथील सावरकर महाविद्यालयाच्या प्राचार्य प्रोफेसर प्रीती पोहेकर, तीनही महाविद्यालयाचे नॅक मूल्यांकनाचे समन्वयक, मानक प्रमुख, सिद्धेश्वर महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक कर्मचारी यांची उपस्थिती होती यावेळी उपप्राचार्य डॉ.गजानन होणा यांनी आभार व्यक्त केले.

आमदार पाहिजे नवा म्हणूनच

पाठवल्यास मतदार संघाचा विकास काय असतो हा नवीन चेहरा दाखवून देणार असल्याने म्हणून आष्टी पाटोदा शिरूर मतदार संघातील आपल्या हक्काचा उमेदवार म्हणून अमोलराजे तरटे यांची चर्चा गावागावात रंगू लागली आहे यामुळे शरदचंद्र पवार साहेब यांनी जनसेवक अमोल तरटे यांना मतदारसंघात उमेदवारी द्यावी.शाहु फुले आंबेडकर विचारधारेवर चालणारे,स्वच्छ प्रतिमेचा, कामाचा व आपल्या हक्काचा माणूस म्हणून अमोलराजे तरटे यांची मतदार संघात जोरात चर्चा आष्टी पाटोदा शिरूर मतदार संघातील प्रत्येक जण बोलून दाखवत आहे.मतदार संघातील प्रत्येकाच्या तोंडात एकच चर्चा, आमदार पाहिजे नवा आष्टी मतदारसंघात अमोल तरटेचीच हवा.

संघटनात्मक बांधणीतुन समाजाचे

डुबे , कार्याध्यक्ष सौ. सोनाली रुद्रवार यांच्यासह नवनिर्वाचित कार्यकारिणीतील पुरुष सदस्यांना समन्वयक अभय कोकड यांनी तर महिला सदस्यांना सौ माधुरी कोले यांनी शपथ दिली तसेच यावेळी दहावी , बारावी यासह स्पर्धा परीक्षा व ईतर क्षेत्रात यश मिळवणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा स्मृतिचिन्ह व बक्षीस देऊन गौरव करण्यात आला.पुढे बोलताना गादेवार म्हणाले कि ; काशी अन्नसत्रमचे कोषाध्यक्ष पद मिळेल हि अपेक्षा आपण बाळगली न्हवती परंतु अन्नसत्रमच्या सर्व सभासद बांधवानी आपल्यावर विश्वास दाखवत आपली बिनविरोध निवड केल्याबद्दल आपण त्यांचे ऋणी आहोत. तसेच लवकरच हैद्राबाद येथे काशीअन्नसत्रमचे मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल उभारण्याचा संकल्प त्यांनी यावेळी बोलवून दाखवला . यावेळी विलास बच्चू व देवकी व्यंकटेश्वरलु यांची देखील समयोचित भाषणे झाली यात त्यांनी महाराष्ट्रातील कार्यक्रम हे नेहमीच चांगले व शिस्तबद्ध पद्धतीने होतात याचे नेहमीच आपणास कौतुक असल्याचे सांगत काशी अन्नसत्रम नेहमीच महाराष्ट्रातील समाजबांधवांना मदत करण्यासाठी कटिबद्ध असल्याचा पुनरुच्चार केला.कार्यक्रमाचे प्रास्ताविक मावळते अध्यक्ष सुमित रुद्रवार यांनी केले तर आभार अजय रुद्रवार यांनी मानले यावेळी जिल्हाभरातील समाजबांधवांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

सोयाबीन कापूस अनुदानाच्या १० हजार रुपयांसाठी ई केवायसी बंधनकारक

प्रक्रिया पूर्ण केल्यावरच पैसे मिळणार

मुंबई : महाराष्ट्र सरकारनं २०२३ च्या खरीप हंगामात ज्या शेतकऱ्यांनी सोयाबीन आणि कापूस उत्पादन घेतलं होतं त्यांना अनुदान देण्याचा निर्णय घेतला होता. त्या निर्णयाप्रमाणं शेतकऱ्यांच्या खात्यावर राज्य सरकारनं २३९८ कोटी ९३ लाख रुपये वर्ग केले आहेत. या अनुदानाचा लाभ घेण्यासाठी शेतकऱ्यांनी ई केवायसी प्रक्रिया पूर्ण करणं आवश्यक आहे.

२०२३ च्या खरीप हंगामातील कापूस व सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना अनुदान वितरणाचा शुभारंभ काल राज्य मंत्रिमंडळ बैठकीत करण्यात आला. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते ऑनलाईन पद्धतीने हे अनुदान शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करण्यात आले. पहिल्या टप्प्यात ४९ लाख ५० हजार खातेदारांच्या खात्यांमध्ये २३९८ कोटी ९३ लाख रुपये जमा करण्यात येत आहेत.

ई केवायसी बंधनकारक : राज्य सरकारच्या कृषी विभागानं शेतकऱ्यांना देण्यात येणारं अनुदान कोणत्याही मध्यस्थांच्य हस्तक्षेपाशिवाय त्यांच्यापर्यंत पोहोचावं यासाठी ई केवायसी प्रक्रिया बंधनकारक केलं आहे. ई केवायसी प्रक्रिया पूर्ण केल्यानंतरच शेतकऱ्यांना अनुदानाचा लाभ मिळेल.

ई केवायसी प्रक्रिया कशी करायची?: शेतकऱ्यांनी वेबसाईटला भेट द्यावी. तिथं वितरण स्थिती या पर्यायावर क्लिक करा. पुढे तुमचा आधार कार्ड नोंदवा, यानंतर कॅप्चा नोंदवा. यानंतर ओटीपी मिळेल. तुम्हाला ओटीपी क्रमांक मिळाल्यानंतर नोंद करा. ओटीपी मिळाल्यानंतर गेट डाटावर क्लिक करा. यानंतर नोंदवलेला ओटीपी आणि मोबाईलवरील ओटीपी जुळल्यास ई केवायसी प्रक्रिया पूर्ण होईल.

बायोमेट्रिक द्वारे केवायसी प्रक्रिया : बायोमेट्रिक या पर्यायावर क्लिक करा. जोडलेल्या उपकरणाची निवड करा.बायोमेट्रिकवरील उपकरणाचा दिवा प्रकाशित झाल्यावर तिथं बोट ठेवा आणि प्रक्रिया पूर्ण करुन घ्या.

किती शेतकऱ्यांना लाभ मिळणार? : २०२३ च्या खरीप हंगामात एकूण ९६ लाख ७८७ खातेदार शेतकरी हे सोयाबीन व कापूस उत्पादक होते. त्यानुसार त्यांना मदत करण्यासाठी राज्य शासनाच्या कृषी विभागाने एकूण ४१९४ कोटी रुपये इतका निधी डीबीटी प्रणालीवर उपलब्ध करून दिलेला आहे. त्यापैकी १५४८ कोटी ३४ लक्ष रुपये कापूस तर सोयाबीन साठी २६४६ कोटी ३४ लक्ष रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे.पोर्टलवरील माहितीनुसार जवळपास ५० लाख शेतकऱ्यांच्या खात्यामध्ये रक्कम वर्ग करण्यात आल्याची माहिती कृषीमंत्री धनंजय मुंडे यांनी दिली. दरम्यान, शेतकऱ्यांना या योजनेतून प्रति हेक्टरी ५ हजार रुपये आणि २ हेक्टर मर्यादेत १० हजार रुपये अनुदान मंजूर करण्यात आले आहे.

चारा बीट : उच्च उत्पादन आणि ऊर्जा देणारे चारा पीक

आयसीएआरने विकसित केलेले चारा बीट हे कोरडवाहू प्रदेशांसाठी एक उच्च उत्पादन देणारे चारा पीक आहे. जे ४ महिन्यांत २०० टन प्रति हेक्टर उत्पादन देते. हे चारा पीक निकृष्ट दर्जाच्या माती आणि पाण्याच्या प्रदेशातही लागवड करता येते आणि चांगले उत्पादन देते. आणि या चारा पिकाच्या लागवडीसाठी खर्च सुद्धा कमी लागतो.

कोरडवाहू प्रदेशात हवामानामुळे वर्षभर हिरवा चारा मिळणे एक आव्हान आहे. राजस्थानमधील जोधपुर येथील आयसीएआर सेंट्रल एरिड झोन रिसर्च इन्स्टीटयूटने या समस्येवर चारा बीट हा एक एक आशादायक उपाय शोधला आहे. हे उच्च उत्पादन देणारे चारा पीक केवळ चार महिन्यांत २०० टन प्रति हेक्टर हिरवे बायोमास तयार करू शकते. विशेषतः आव्हानात्मक परिस्थितीसाठी विकसित केलेले, चारा बीट प्रामुख्याने पशुखाद्य म्हणून वापरले जाते आणि पशुधनाच्या दुग्धोत्पादनाला चालना देण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावते, ज्यामुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढते. सध्या राजस्थान, मध्य प्रदेश, हरियाणा, छत्तिसगड, केरळ आणि उत्तर प्रदेश या राज्यांमध्ये त्याची लागवड केली जाते.

चारा बीटचे मुख्य वैशिष्ट्य : चारा बीट हे निकृष्ट दर्जाच्या पाणी आणि मातीतही पिकवता येते. चाऱ्याचे उच्च उत्पादन मिळते. पशुंची दूध उत्पादन क्षमता सुधारते. लागवड खर्च कमी आहे. सर्वोत्तम चारा बीट जाती : जोमोन – ही केशरी रंगाची बीटची जात पानांचे रोग आणि अवेळी बियाणे निर्मिती सारख्या समस्येला प्रतिकारक आहे. मोनरो – ही लाल रंगाची बीटची जात सुद्धा अवेळी बियाणे निर्मिती सारख्या समस्येला उत्कृष्ट प्रतिकारक आहे. जे के कुबेर – ही केशरी रंगाची बीटची उच्च उत्पादन देणारी जात असून जनावरांना पचण्यास सोपी आणि देणारी आहे. जेरोनिमो – ही पिवळ्या-केशरी बीटची जात असून बुरशीजन्य रोगास सहनशील आहे.

अशा पद्धतीने करा वाटाणा पिकाची लागवड

वाटाणा हे थंड हवामानातील पीक असून या पिकाची महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात लागवड केली जाते. वाटाण्याचा उपयोग आहारात भाजी म्हणून केला जातो. हिरवे वाटाणे हवाबंद करून, गोठवून किंवा सुकवून बराच काळ साठविता येतात. हिरवे ओले वाटाणे वाळवून त्यापासून डाळ बनविता येते. वाटाण्यामध्ये कार्बोहाइड्रेट, प्रोटीन्स तसेच फॉस्फरस, पोटॅशियम, मेग्निशियम हि खनिजे आणि अ, ब, व क जीवनसत्वे भरपूर प्रमाणात असतात.

लागवडीसाठी जमीन : वाटाणा लागवडीसाठी मध्यम ते भारी निचऱ्याची जमीन निवडावी. जमिनीचा सामू ५.५ ते ६.७ इतका असावा. लागवडीपूर्वी उभी आडवी नांगरट करून २ ते ३ कुळवाच्या पाळ्या द्याव्यात. ढेकळे व्यवस्थित फोडून जमीन सपाट करून घ्यावी.

सुधारीत जाती व लागवडीचे अंतर : वाटाणा लागवडीसाठी बोनव्हिला, अरकेल, फुले प्रिया या वाणांची लागवड करावी. वाटाण्याची लागवड रब्बी हंगामात ऑक्टोबर ते नोव्हेंबर महिन्यात करावी. सरी-वरंबे किंवा सपाट वाफे पद्धतीने लागवडीसाठी ३० १५ सें.मी. इतके अंतर ठेवावे. टोकण पद्धतीने लागवड करण्यासाठी प्रतिहेक्टरी ३०-४० कि.ग्रॅ. बियाणे लागते. तर पेरणी पद्धतीने लागवडीसाठी प्रतिहेक्टरी ७०-८० कि.ग्रॅ. बियाणे लागते.

बीजप्रक्रिया व खत व्यवस्थापन : कॅप्टन किंवा कार्बेन्डाझिम ३ ग्रॅम प्रति किलो बियाणे या प्रमाणात बियास चोळावे. लागवडीपूर्वी १५:६०:६० किलो नत्र:स्फुरद:पालाश प्रतिहेक्टरी द्यावे. लागवडीनंतर एक महिन्याने १० किलो नत्र खताची मात्रा द्यावी. वाटाणा पिकाचा कालावधी वाणानुसार ८० ते १०० दिवसांचा असतो.

रोग व कीड व्यवस्थापन : वाटाणा पिकावर मावा, शेंगा पोखरणारी आली या किडींचा तर भुरी, मर रोग या रोगांचा प्रादुर्भाव आढळून येतो. मावा ही कीड हिरव्या रंगाची लागण असते. ते पानातून रस शोषून घेतात. त्यामुळे झाडे निस्तेज बनतात. शेंगा पोखरणारी अळी – हिरव्या रंगाची हि अळी प्रथम शेंगाची साल खाते व आत शिरते आणि दाणे पोखरून खाते. उपाययोजना – यासाठी मॅलॅथिऑन ५० ईसी, ५०० मिली किंवा फॉस्फॉमिडॉन ८५ डब्ल्यू ईसी, १०० मिली किंवा डायमेथोएन ३० ईसी, ५०० मिली किंवा मिथिलडेमेटॉन २५ ईसी, ४०० मिली, ५०० लिटर पाण्यात मिसळून प्रती हेक्टरी फवारावे. पेरणीनंतर ३ आठवड्यांनी पहिली फवारणी करावी. भुरी रोगामुळे पिकाचे अतोनात नुकसान होते. या रोगात प्रथम पानांच्या दोन्ही बाजूंवर पांढरी पावडरीसारखी बुरशी दिसून येते. नंतर ती रोपाच्या सर्व हिरव्या भागावर जलद पसरते व झाडाची उत्पादनक्षमता त्यामुळे खालावते.

उपाय : यासाठी मार्फोलीन २५० मिली किंवा पानाय्त मिसळणारे गंधक ८० टक्के १२५० ग्रॅम किंवा डिनोकॅप ४० डब्ल्यू पी ५०० ग्रॅम प्रती हेक्टरी ५०० लिटर पाण्यात मिसळून फवारावे. किंवा गंधकाची भुकटी ३०० मेश प्रतिहेक्टरी २० किलो या प्रमाणात धुरळावी. नंतर १५ दिवसांच्या अंतराने फवारणी / धुरळणी करावी. रोगास प्रतिबंधक अशा जातींचा वापर करावा.

मर रोग या रोगाचा प्रसार जमिनीतील बुरशीमुळे होतो. रोगग्रस्त झाड पिवळे पडून वाळते. उपाय म्हणून पेरणीपूर्वी बियास थायरम हे बुरशीनाशक औषध प्रति किलोस ३ ग्रॅम या प्रमाणात चोळावे.

उत्पादन : वाटाणा पिकाचे वाणपरत्वे हिरव्या शेंगाचे- ४ ते ७ टन तर वाळलेले वाटाणे १.५ ते २ टन इतके प्रति हेक्टरी उत्पादन मिळते.

जागतिक दिवस:
महात्मा गांधी जयंती
लाल बहादूर शास्त्री जयंती
बालसुरक्षा दिन
स्वच्छता दिन

महत्वाच्या घटना

- १९०९ : रमाबाई रानडे यांनी पुणे सेवासदन सोसायटीची स्थापना केली.
- १९२५ : जॉन लोगी बेअर्ड याने पहिल्या दूरदर्शन संचाचे प्रात्यक्षिक दाखवले.
- १९५५ : पेरांबूर येथे 'इन्टिग्रल कोच फॅक्टरी' सुरू झाली
- १९५८ : गिनीला (फ्रान्सपासुन) स्वातंत्र्य मिळाले.
- १९६७ : थरगुड मार्शल हे अमेरिकन सर्वोच्च न्यायालयाचे पहिले कृष्णवर्णीय न्यायाधीश बनले.
- १९६९ : महात्मा गांधींच्या जन्मशताब्दीचे औचित्य साधून त्यांची प्रतिमा व सही असलेल्या २, ५, १० व १०० रुपयांच्या नोटा रिझर्व्ह बँकेने जारी केल्या.
- १९९२ : साली झी टीवी चे संस्थापक सुभाषचंद्र यांनी देशातील पहिल्या खाजगी उपग्रह वाहिनीची सुरवात केली होती.
- २००६ : निकेल माइन्स, पेनसिल्व्हानिया येथे चार्ल्स कार्ल रॉबर्ट्सने आमिश शाळेत पाच शाळकरी मुलींना गोळ्या घालून ठार मारले व नंतर आत्महत्या केली.

जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

- ९७१ : गझनीचा महमूद यांचा जन्म. (मृत्यू: ३० एप्रिल १०३०)
- १८४७ : पॉल फॉन हिन्डेनबर्ग जर्मनीचे दुसरे राष्ट्राध्यक्ष (मृत्यू: २ ऑगस्ट १९३४)
- १८६९ : महात्मा गांधी (मृत्यू: ३० जानेवारी १९४८ नवी दिल्ली)
- १८९१ : विनायक पांडुरंग करमरकर शिल्पकार, १९२३ मधे पुण्याच्या श्री शिवाजी प्रिपरेटरी मिलिटरी स्कूलच्या आवारात बसवलेला शिवाजी महाराजांचा अश्वारुढ पुतळा त्यांनी बनवला आहे. पद्मश्री (१९६४) (मृत्यू: १३ जून १९६७) येथे क्लिक करा
- १९०४ : लाल बहादूर शास्त्री स्वतंत्र भारताचे तिसरे पंतप्रधान. त्यांना मरणोत्तर 'भारतरत्न' सन्मानाने गौरविण्यात आले होते. (मृत्यू: ११ जानेवारी १९६६)
- १९०८ : गंगाधर बाळकृष्ण तथा 'गं. बा.' सरदार विचारवंत व साहित्यिक, पुरोगामी चळवळीचे भाष्यकार, दलित साहित्य संमेलनाचे अध्यक्ष (१९७८), बार्शी येथील अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष (१९८०) (मृत्यू: १ डिसेंबर १९८८)
- १९२७ : पं. दिनकर कैकिणी शास्त्रीय गायक (मृत्यू: २३ जानेवारी २०१०)
- १९३९ : भारतीय क्रिकेटपटू बुद्धी कुंदर यांचा जन्म. (मृत्यू: २३ जून २००६)
- १९४२ : आशा पारेख चित्रपट अभिनेत्री
- १९४८ : पर्सिस खंबाटा अभिनेत्री, मॉडेल आणि लेखिका (मृत्यू: १८ ऑगस्ट १९९८)
- १९६४ : साली प्रसिद्ध भारतीय राजकारणी व कार्यकर्त्या तसचं, स्वतंत्र भारतातील पहिल्या आरोग्यमंत्री महिला राजकुमारी अमृत कौर यांचे निधन.
- १९६८ : याना नोव्होत्ना झेक लॉन टेनिस खेळाडू
- १९७१ : कौशल इनामदार संगीतकार व गायक

मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

- १९०६ : राजा रविवर्मा चित्रकार (जन्म: २९ एप्रिल १८४८)
- १९२७ : स्वांते अर्हेनिअस स्वीडीश भौतिक व रसायनशास्त्रज्ञ (जन्म: १९ फेब्रुवारी १८५९)
- १९८५ : रॉक हडसन अमेरिकन अभिनेता (जन्म: १७ नोव्हेंबर १९२५)
- १९७५ : के. कामराज स्वातंत्र्यसैनिक, खासदार व तामिळनाडुचे मुख्यमंत्री (जन्म: १५ जुलै १९०३)

रब्बी सूर्यफूल लागवड तंत्रज्ञान

दिवसेंदिवस खाद्यतेलाची मागणी वाढत आहे. जागतिक पातळीवर सोयाबीन, मोहरी, भुईमूग या पिकानंतर सूर्यफूल हे चौथ्या क्रमांकाचे तेलबिया पिक आहे. या पिकाची लागवड खरीप तसेच रब्बी हंगमातही केली जाते. आपल्या देशात कर्नाटक, महाराष्ट्र आणि आंध्र प्रदेश ही प्रमुख सूर्यफूल उत्पादक राज्ये आहेत. महाराष्ट्रातील बरेच शेतकरी या पिकाच्या लागवडीकडे वळत आहेत. सूर्यफूल पिकाच्या लागवडीची महिती आपण जाणून घेऊया.

सूर्यफूल लागवडीसाठी पूर्वमशागत व लागवडीचा हंगाम : पेरणीआधी जमिनीची खोल नांगरट करून कुळवाच्या आडव्या-उभ्या पाळ्या द्याव्यात. कोरडवाहू सूर्यफुलाची पेरणी दोन चाड्याच्या पाभरीने करावी. बियाणे ५ सें.मी. पेक्षा जास्त खोल पेरू नये. बागायती सूर्यफुलाची लागवड सरी-वरंब्यावर टोकन पद्धतीने करावी. मध्यम ते खोल जमिनीत अंतर ४५ बाय ३० सें.मी. तर भारी जमिनीत ६० बाय ३० सें.मी. ठेवावे. रब्बी हंगामात कोरडवाहू सूर्यफुलाची पेरणी १५ ऑक्टोबर पूर्वी करावी. तसेच बागायती सूर्यफुलाची पेरणी नोव्हेंबर महिन्याच्या पहिल्या पंधरवड्यापर्यंत करावी. सूर्यफूल लागवडीसाठी पाण्याचा चांगला निचरा होणारी जमीन निवडावी. आम्लयुक्त व पाणथळ जमिनीत हे पीक घेऊ नये.

बीजप्रक्रिया व पिकाचे वाण : पेरणीसाठी सुधारित बियाणांचे वाण ८ ते १० कि.ग्रॅ. तर संकरित बियाणे ५ ते ६ कि.ग्रॅ. प्रति हेक्टरी वापरावे. मर रोगाच्या प्रतिबंधासाठी प्रतिकिलो बियाणास २ ते २.५ ग्रॅम थायरमची बीजप्रक्रिया करावी.

सुधारीत वाण : एस.एस. ५६ – कमी कालावधीत येणारे हे वाण असून अवर्षणग्रस्त भागात या वाणाची लागवड करावी. हे वाण ८० ते ८५ दिवसांत तयार होते. या वाणापासून सरासरी प्रति हेक्टरी ९ ते १० क्विंटल उत्पादन मिळते.

मॉडर्न – हे वाण उशिरा पेरणीसाठी योग्य असून पिकाची उंची कमी असते. सरासरी प्रतिहेक्टरी ७ ते ८ क्विंटल इतके उत्पादन मिळते.

भानू : हे सूर्यफुलाचे वाण कोणत्याही हंगामात घेता येते. हे वाण ८५ ते ९० दिवसांत तयार होते. प्रतिहेक्टरी १२ ते १३ क्विंटल उत्पादन मिळते.

संकरित वाण : के.बी.एस.एच. १ – या वाणामध्ये तेलाचे प्रमाण व उत्पादनक्षमता अधिक आहे. ८५ ते ९० दिवसांत तयार होते. १२ ते १४ क्विंटल प्रतिहेक्टरी उत्पादन मिळते. एल.एस.एच-३५ – अधिक उत्पादनक्षमता, केवडा रोगास प्रतिकारक हे वाण आहे. ९० ते ९५ दिवसात तयार होते. प्रति हेक्टरी १८ ते २० क्विंटल उत्पादन मिळते. एल.एस.एफ.एच १७१ – या वाणाची लागवड कोरडवाहू तसेच बागायतीसाठी करता येते.

खत व्यवस्थापन : जमिनीची पूर्वमशागत करताना लागवडीपूर्वी प्रतिहेक्टरी २.५ टन शेणखत टाकावे. कोरडवाहू पिकासाठी माती परीक्षणानुसार हेक्टरी ५० किलो नत्र, २५ किलो स्फुरद व २५ किलो पालाश हे खत वेळी दोन चाड्याच्या पाभरीने पेरणीच्या वेळी द्यावे. बागायती पिकासाठी ६० किलो नत्र, ३० किलो स्फुरद, ३० किलो पालाश द्यावे. यापैकी पेरणीच्या वेळी ३० किलो द्यावे. व पेरणीनंतर १ महिन्याने उर्वरित ३० किलो नत्र द्यावे. मशागत व पाणी व्यवस्थापन : पेरणीनंतर १५ दिवसांनी सूर्यफुलाची विरळणी करावी. दोन रोपांतील अंतर ३० सें.मी. ठेवावे. आवश्यकतेनुसार एक ते दोन खुरपण्या कराव्या. पेरणीनंतर २० ते २५ दिवसांनी एक आणि ३५ ते ४० दिवसांनी एक अशा दोन कोळपण्या कराव्यात. पिकाची रोपावस्था, फुलकळी, फुलोरा व दाणे भरताना अशा वाढीच्या अवस्थांमध्ये पिकाला पाणी द्यावे.

कृत्रिम परागीभवन : पिकामध्ये दाणे भरण्यासाठी फुलाचे परागीभवन होणे आवश्यक असते. कृत्रिम परागीभवन करण्यासाठी हाताच्या पंजाला तलम कापड गुंडाळून सकाळी ६ ते ११ या वेळेत दर दिवसाआड तीन ते चार वेळा पिकावरून हळूवार हात फिरवावा. मधमाश्यांच्या चार ते पाच पेट्या एक हेक्टर पिकात ठेवाव्यात.

गुलाबी राजकिय प्रचार विरोधात लाल वादळ

» योजना राबवत लाचार करण्याचे काम–कॉ.डॉ.अजित नवले
» शेतकरी मेळाव्याने तेलगाव परिसर गजबजला
» ४ ऑक्टोबर पासून तेलगाव मध्ये बेमूदत धरणे आंदोलन

धारूर। प्रतिनिधी

जिल्हात जन्मसन्मान यात्रेच्या माध्यमातून सरकारी यंत्रणेचा गैरवापर करत गुलाबी राजकीय प्रचार एका बाजूला सुरू असताना अस्मानी आणि सुलतानी संकटात जीवन मरणाच्या यातना सहन करणारा शेतकरी लाल झेंड्याखाली एकत्र येत शेतकऱ्यांनी मेळाव्याचा माध्यमातून बीड जिल्ह्यातील पिक विमा वितरण याद्या प्रकाशित करून सोयाबीनला सात हजार, कापसाला दहा हजार रुपये केलेल्या घोषणांची आणि नैसर्गिक संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांकरिता सरकारने केलेल्या प्रत्येक घोषणाची प्रत्यक्ष कृती कार्यक्रम राबवावा असा ठराव मंगळवार दि १ रोजी माजलगाव तालुक्यातील तेलगाव येथे झालेल्या भव्य शेतकरी मेळाव्यात एकमुखाने घेण्यात आला आहे.४ आक्टोबर पासून तेलगाव येथे बेमूदत धरणे आंदोलन करण्याचा निर्धार यावेळी करण्यात आले.

बीड जिल्ह्याचे माजी खासदार, अखिल भारतीय किसान सभेचे राज्य अध्यक्ष झुंजार स्वातंत्र्यसेनानी कॉ.गंगाधरअप्पा बुरांडे यांच्या स्मृतीदिना निमित्य तेलगाव येथील वृंदावन मंगल कार्यालय या ठिकाणी भव्य शेतकरी मेळाव्याचे आयोजन बीड जिल्हा किसान सभेकडून करण्यात आले होते.या प्रसंगी किसान सभेचे राज्य सचिव कॉ.डॉ.अजित नवले हे प्रमुख वक्ते, अध्यक्षस्थानी कॉ.काशीराम सिरसाट, स्वागताध्यक्ष कॉ.दत्ता डाके, किसान सभेचे जिल्हाध्यक्ष कॉ.एड.अजय बुरांडे यांची प्रमुख उपस्थिती होती. उपस्थित शेतकऱ्यांना मार्गदर्शन

करताना कॉ.नवले यांनी अभ्यासपूर्ण मांडणी करत राज्य सरकारची शेतकरी आणि शेती विषयक उदासीन धोरणे स्पस्ट करत सत्तेत असणारी राजकीय मंडळी विविध योजना राबवत राज्यातील जनतेला लाचार बनविण्याचे काम करत असून लाचार व्यक्ती करण्याचे सुनियोजित कार्यक्रम सत्तेत असलेल्या धर्मांध, जातीयवादी मंडळी करत आहे.कष्टकरी, शेतकरी याना घामाचा मोबदला द्यायचा नाही त्यांना स्वाभिमानाने जगू न देता लाडक्या योजना राबवून लाचार बनविण्याचे काम हे सरकार करत आहे. शेती, शेतकरी,आरोग्य, शिक्षण, रोजगार या बाबतीत सत्ताधारी जाणीवपूर्वक दुर्लक्ष करून नाना प्रकारे भावनिक राजकारण करण्यात विद्यमान सत्तेतील लोक शासकीय यंत्रणा आणि सरकारी पैसा खर्च करत आहे.राज्याचे कृषी मंत्री हे देशात सर्वाधिक आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्यांचा जिल्हा म्हणून ओळखल असलेल्या जिल्ह्याचे प्रतिनिधीत्व करतात मात्र याच जिल्ह्यातील शेतकरी आजमितीस अस्मानी आणि सुलतानी संकटात जीवन मरण यातना भोगत आहे. बीड जिल्ह्यातील पीक विमा प्रकरण मागील अनेक वर्षापासून किसान सभा उचलून धरत असून सर्वात मोठा पीक घोटाळा उघडकीस येऊ नये म्हणून पीक विमा वाटप याद्या प्रकाशित करण्यात येत नाहीत. राज्याच्या कृषीमंत्राना शेती, शेतीचे ज्ञान, कृषिमूल्य आयोग, आयोगाची कर्तव्य आणि जबाबदारी, आधार भाव, भावांतर, राज्याची आणि केंद्राची याबाबत भूमिका याबद्दल शून्य ज्ञान असून गुंड प्रवृत्तीचे चारित्र्य असलेले सरकार राज्यात सत्तेवर आहे ही शोकांतिका आहे असे परखड मत व्यक्त केले.

या शेतकरी मेळाव्याच्या प्रास्ताविकात किडण सभेचे जिल्हाध्यक्ष कॉ.एड अजय बुरांडे यांनी शेतकऱ्यांच्या या संकट काळात विविध मेळावे घेताना सरकारने केलेल्या घोषणांची किती अंमलबजावणी केली.दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना किती मदत केली हे जाहीर करावे असे आवाहन करत निवडणूक डोळ्यासमोर ठेऊन सरकारी यंत्रणेचा गैरवापर करत राजकिय प्रचार करण्यापेक्षा कर्ज माफी, विमा वाटप, २०१७ पासून केलेल्या विविध सानुग्रह अनुदान वाटप तात्काळ करण्यात यावे अन्यथा किसान सभेकडून तीव्र पाऊले उचलली जातील असा इशारा सरकारला दिला. या मेळाव्यात स्वागताध्यक्ष कॉ.दत्ता डाके यांनी किसान सभा निवडणूक तिकीट, राजकीय स्वार्थ न बघता फक्त शेतकऱ्यांच्या प्रश्नावर, त्याच्यावर होणाऱ्या अन्यायावर काम करणारी संघटना असल्याचे सांगितले.

लेक वाचली पाहिजे शिकली पाहिजे, सन्मानाने जगली पाहीजे – जयश्री विधाते

बीड। प्रतिनिधी

स्व. लोकनेत्या केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर उर्फ काकु यांच्या स्मृती दिनानिमित्त गीता कन्या प्रशाला बीड मध्ये विविध स्पर्धा आणि विज्ञान आणि गणित विषयाच प्रदर्शन भरविण्यात आले होते, या कार्यक्रमाचे उद्घाटन जयदत्त आण्णा क्षीरसागर विचारमंच महीला आघाडी बीड विधानसभा प्रमुख जयश्री विधाते यांच्या हस्ते झाले.या कार्यक्रमाला जयश्री पांगारकर यांची प्रमुख उपस्थिती लाभली होती. कार्यक्रमाची सुरुवात काकु – नाना यांच्या प्रतिमेचे पूजन आणि अभिवादन करुन सामुहिक प्रार्थनेने झाली. कार्यक्रमाचे उद्घाटक आणि प्रमुख अतिथीचे शाळेच्या वतीने शाल पुष्पगुच्छ देऊन यथोचित सन्मान करण्यात आला. मान्यवरांच्या हस्ते फीत कापून प्रदर्शनाचे उद्घाटन झाले.

कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात शंकर शामराव पाटील सरांनी शाळेतील शैक्षणिक सांस्कृतिक क्रिडाआणि

कला क्षेत्रातील क्षेत्रातील प्रगतीचा आढावा घेतला. कार्यक्रमाच्या उद्घाटिका विधातेताई यांनी विद्यार्थ्यांनीसशी संवाद साधताना काकुंचा आठवणींना उजाळा देत त्यांच्या राजकीय सामाजिक शैक्षणिक क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरी बद्दल अभिमान व्यक्त केला. काकुंनी घालून दिलेल्या मार्गाने जात असतान लेक वाचली पाहिजे लेक शिकली पाहिजे आणि सन्मानाने जगली पाहिजे यासाठी आपण सर्वांनी प्रामाणिक प्रयत्न केले पाहीजे अशी अपेक्षा व्यक्त केली.कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य सुरेश अनंतराव पेशकारसर यांनी शाळेतील आपल्या अध्यक्षीय समारोपाच्या भाषणात शाळेतील शिक्षिका विद्यार्थीनींसाठी आईच्या भुमिकेतुन ज्ञानदाना बरोबरच त्यांच्या संगोपन आणि संस्कारांची जी जबाबदारी पार पाडतात या बद्दल त्यांचे तोंडभरून कौतुक करत शाब्बासकीची थाप दिली.या कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन शशिकांत गायकवाड यांनी तर या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन श्रीकांत कुलकर्णी यांनी केले. यावेळी शाळेतील विद्यार्थ्यांनी आणि शिक्षकवृंद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सहशिक्षिका लता पारगावकर यांचा सेवापुर्ती कार्यक्रम

माजलगाव। प्रतिनिधी

जिल्हा परिषद माध्यमिक कन्या शाळा येथे कार्यरत मराठी विषयाच्या माध्यमिक शिक्षिका श्रीमती लता जगन्नाथराव पारगावकर या नियत वयोमानानुसार आपली यशस्वी ३९ वर्षे सेवा करून ३० सप्टेंबर २०२४ रोजी सेवानिवृत्त झाल्या.त्यांच्या सेवापूर्ती सत्कार समारंभ कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून शाळेचे मुख्याध्यापक मिलिंद गरबडे तर विशेष अतिथी म्हणून महाराष्ट्राचे ख्यातनाम कवी प्रभाकर साळेगावकर व सुप्रसिद्ध लेखिका प्रा.स्नेहल पाठक,सिद्धेश्वर विद्यालयाचे कार्यवाहक विश्वासराव जोशी हे उपस्थित होते.या सर्वांनी आपल्या मनोगतामध्ये मॅडमच्या सेवेचा गौरव केला व भावी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

माजलगाव तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी रवींद्र महामुनी तसेच पत्रकार उमेशकाका मोगरेकर,पत्रकार महेंद्र मस्के,माजलगाव नं.१ केंद्राचे

केंद्रप्रमुख धनंजय कुलकर्णी,केंद्रीय मुख्याध्यापक बालासाहेब टोपे,माजी मुख्याध्यापिका मंगल समुद्रे,माजी विद्यार्थिनी रेखा अंदुरे, प्रभाकर क्षीरसागर, डॉ.दत्तात्रय पारगावकर, शिक्षक पतसंस्थेचे अध्यक्ष रमेश फपाळ, केंद्रप्रमुख शिवाजी बलशेटवाड, पेन्शनर संघटनेचे शिवाजी धाईजे, मुकुंद जोशी यांनी उपस्थित राहून मॅडमला शुभेच्छा दिल्या. या सेवापूर्ती कार्यक्रम प्रसंगी शाळेतील विद्यार्थिनी सय्यद आलिया, उज्वाला शिंदे,जोहा शेख,वंदना ढगे तसेच सहशिक्षिका मंदा सारुक, प्रणिता पारगावकर,मुलगी डॉ.प्रांजली देशपांडे,शोभा पारगावकर व सहशिक्षक गोरखराव घाटूळ यांनी आपले मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी शाळेतर्फे,कौटुंबिक नातेवाईक व आप्तेष्ट यांच्या तर्फे, माजी सहकारी शिक्षक शिक्षिका यांनी विशेष सत्कार केला.या सत्काराला उत्तर देताना सत्कारमूर्ती लता पारगावकर यांनी आपल्या यशस्वी ३९ वर्षाच्या सेवेबद्दल समाधान व्यक्त केले व उपस्थित सर्वांचे आभार मानले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाळेतील सांस्कृतिक विभाग प्रमुख शरद नायबळ यांनी केले.पाहुण्यांचा व मॅडमचा परिचय शाळेतील सहशिक्षक बाळासाहेब सोनसळे यांनी आपल्या खास शैलीत प्रास्ताविकमध्ये करून दिला तर कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन चंद्रकांत यादव यांनी केले. हा कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी शाळेतील सहशिक्षिका संगीता राठोड, ज्योती कोडगीरकर, संगीता शिंदे,लोणीकर जयश्री,मगर वंदना,तसेच सहशिक्षक दिनकर वाघमारे,मधुकर मकसरे,सुंदर काळे, राजकुमार सोनपसारे,नारायण भालशंकर,विलास रेवलकर, बालासाहेब कांबळे,बालासाहेब जामकर,सौदागर एच.एच,अब्दुल शेख व गोरख उघडे यांनी मोलाचे सहकार्य केले.

टीबी मुक्त ग्रामपंचायत म्हणून धनगर जवळका ग्रामपंचायतीचा झाला सन्मान

बीड । प्रतिनिधी

राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमांतर्गत टीबी मुक्त ग्रामपंचायत मोहिमे अंतर्गत धनगर जवळका ग्रामपंचायतीची निवड झाली असून या ग्रामपंचायतीने स्वच्छतेबरोबरच गावच्या आरोग्याचीही काळजी घेत पुन्हा एकदा मानचा तुरा रोवला गेला आहे. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य जीवने, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) डॉ. ज्ञानोबा मोकाटे जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.उल्हास गंडाळ, जिल्हा क्षयरोग अधिकारी माने, आठवले यांच्या हस्ते आरोग्य विभागाच्या वतीने गावच्या लोकनियुक्त सरपंच सुरेखा अभयराजे पवार यांचा सन्मान चिन्ह,प्रशस्तीपत्र देऊन गौरव करण्यात आला, व या निवडीबद्दल त्यांचे व समस्त गावकऱ्यांचे अभिनंदन केले.

केंद्र शासनाने प्रधानमंत्री टीबी मुक्त भारत अभियान सुरू केले असून हे अभियान पाटोदा तालुक्यातील धनगर जवळका येथे गावकऱ्यांनी मिळून प्रभावीपणे राबविल्या ने निवड झाली, या निवडीमुळे ग्रामपंचायतचा सन्मान चिन्ह, प्रशस्तीपत्र देऊन गौरव करण्यात आला असून याप्रसंगी गावच्या लोकनियुक्त अविरोध सरपंच सौ. सुरेखा

अभयराजे पवार म्हणाल्या की, हा गौरव लहानांपासून थोऱ्या मोठ्याचा सर्व धनगर जवळका ग्रामस्ताचा असून आमच्या गावच्या एकीमुळे शक्य झाला आहे. इथून पुढेही जेष्ठाच्या मार्गदर्शनाखाली आम्ही सर्व शासकीय योजना प्रभावीपणे राबवणार असून, कुठल्याही कार्याला आमच्या गावकऱ्याची भरभरून साथ असते, म्हणूनच आमच्या गावचा विकास करण्यात आम्ही कुठेच कमी पडत नाहीत. आता या निवडीमुळे आमची सर्वांची जबाबदारी वाढली असुन पुढचा हि पुरस्कार आम्हीच मिळू असा विश्वासही यावेळी त्यांनी व्यक्त केला. यावेळी गावच्या ग्रामसेवक प्रगती खेडकर ,समुदाय आरोग्य अधिकारी भारती सह तालुका आरोग्य विभागातील कर्मचारी उपस्थित होते.

डॉ. साळुंके यांच्या नाट्य लेखनात वेगळेपण- प्रा.दळवी

बीड। प्रतिनिधी

मर्यादित पात्रांचे नाट्यलेखन अत्यंत कठीण असते. केवळ दोन पात्रांना घेऊन नाट्यबीज उभा करणे हे कौशल्याचे काम असते. मात्र डॉ. सतीश साळुंके यांच्या 'बिहाईन्ड दि कर्टन' सारख्या नाटकातून टोकदार आशयघन संवाद आणि नाटकाची वैशिष्ट्यपूर्ण मांडणी वाखाणण्यासारखी असल्याचे प्रतिपादन सुप्रसिद्ध नाटकार प्रा. अजित दळवी यांनी केले.

प्रा.दळवी यांच्या हस्ते नाटककार डॉ. सतीश साळुंके यांच्या 'बिहाईन्ड दि कर्टन' व 'उत्क्रांत' या दोन नाटकाच्या पुस्तकांचे प्रकाशन झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मराठवाडा साहित्य परिषदेचे अध्यक्ष कौतिकराव ढाले पाटील होते. याप्रसंगी जेष्ठ अभिनेत्री अनुया दळवी, मसापचे कार्यवाह दादा गोरे, उपाध्यक्ष किरण सगर व कैलास पब्लिकेशनचे प्रमुख आणि मसापचे कोषाध्यक्ष कुंडलिकराव अतकरे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

प्रा. दळवी पुढे म्हणाले की, बीड सारख्या ठिकाणी नाटकाच्या अद्यायावत माहितीचा अभाव असताना सातत्याने गेली ३०– ४० वर्ष सतीश साळुंके हे नाट्य क्षेत्रात रचनात्मक काम करीत आहेत. इतिहास

संशोधन, नाट्य प्रस्तुती, बालनाट्य सादरीकरण, अभिनय प्रशिक्षण शिबिरे आणि नाट्यलेखन करीत त्यांनी परिवर्तन प्रतिष्ठांचे नाव सर्व दुरून नेले. साळुंके यांचे लेखन सामाजिक पर्यावरणाच्या भोवतालावर भाष्य करणारी असून त्याचे 'उत्क्रांत' नाटक मानवी जीवनाच्या उत्क्रांती सोबतच मानवाने परिस्थितीतून कमावलेल्या वैगुण्य व गुणावर अत्यंत प्रभावी भाष्य करते. कार्यक्रमाचे अध्यक्ष कौतिकराव ठाले पाटील आपल्या भाषणात म्हणाले की, डॉ. सतीश साळुंके हे मराठवाड्यातील दत्ता भगत–अजित दळवी यांच्या नंतरच्या पिढीतील एक प्रमुख नाटककार आहेत. त्यांनी केलेल्या प्रयत्नांमुळेच बीडला सांस्कृतिक आकार आला. एका अर्थाने डॉ . सतीश साळुंके बीडचा सांस्कृतिक चेहरा आहेत. कार्यक्रमाच्या आरंभी दीपप्रज्वलन करण्यात आले. यावेळी डॉ साळुंके यांनी प्रास्ताविक केले तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अण्णासाहेब गडदे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मंगेश रोटे, प्रशांत मुळे, दीपक सरवदे, प्रा हनुमंत भूमकर, प्राचार्य जे.एम. पैठण, प्रा डॉ. रेखा ढेरे– घोलप आणि अण्णासाहेब गडदे यांनी श्रम घेतले. कार्यक्रमास प्राचार्य डॉ .दीपाताई क्षीरसागर, ज्येष्ठ साहित्यिक अमर हबीब, कवी संमेलनाचे अध्यक्ष प्रा. सय्यद अह्लाउद्दीन यांच्यासह जिल्ह्यातील मान्यवर साहित्यिक मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

श्रीराम बन्सीलाल मालानी यांचे निधन

माजलगाव। प्रतिनिधी

शहरातील शाहू नगर येथील राहवाशी आणि प्रसिद्ध कापडाचे व्यापारी असलेले श्रीराम बन्सीलाल मालानी यांचे मंगळवारी रात्री साडेआकाराच्या सुमारास निधन झाले .श्रीराम बन्सीलाल मालानी हे प्रसिद्ध कापडाचे व्यापारी म्हणून सर्वदूर परिचित होते मंगळवारी त्यांचे रात्री साडे अकरा वाजण्याच्या सुमारास निधन झाले मृत्यू समयी त्यांचे वय ६० वर्ष होते त्यांच्यावर राजस्थानी स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले विशाल,रवी यांचे ते वडील होते,त्याच्या पच्यात पत्नी,सुना,नातवंडे असा मोठा परिवार आहे मालानी परिवाराच्या दुःखात दैनिक प्रजापत्र परिवार सहभागी आहे.

जिल्हा परिषदेच्या शाळा टिकवणे काळाची गरज- रवींद्र महामुनी

जिल्हा परिषदेच्या शाळेतून सर्वांगीण शिक्षण मिळते–येवले; मुख्याध्यापक प्रभाकर आवाड यांचा सेवापूर्तीचा कार्यक्रम

माजलगाव । प्रतिनिधी

जिल्हा परिषद शाळेची पटसंख्या कमी होऊ लागली आहे तेव्हा या जिल्हा परिषदेच्या शाळेची पटसंख्या वाढवून ह्या शाळा टिकवणे काळाची गरज असल्याचे मत गटशिक्षण अधिकारी रवींद्र महामुनी यांनी व्यक्त केले तर जिल्हा परिषदेच्याच शाळेतून विद्यार्थ्यांना सर्वांगीण शिक्षण मिळते असे मत तुकाराम येवले यांनी व्यक्त केले. जिल्हा परिषद प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळा सिमरी पारगाव शाळेचे मुख्याध्यापक प्रभाकरराव आत्माराम आवाड यांच्या सेवापुर्ती सत्कार सोहळ्यात चे आयोजन दिनांक ३० सप्टेंबर रोजी दुपारी दोन वाजता शाळेच्या प्रांगणात आयोजित केलेल्या कार्यक्रमात अध्यक्षीय समारोप करताना महामुनी बोलत होते.

या कार्यक्रमास मंचावर ह भ प भगवान बाबा पाञुडकर तुकाराम येवले केंद्रप्रमुख भागवतराव डाके मुख्याध्यापक साहेबराव राठोड सरपंच छगनराव कांबळे रमेशराव

फपाळ,अंकुशराव डाके उमाकांत सोळंके नितीन काळे विठ्ठलराव आरबे, उपसरपंच घनश्याम भुतडा,परमेश्वर शिंदे मुकुंद जोशी आबाजी भोसले सय्यद हरून विश्वनाथराव कोरडे महेमूद शेख उपस्थित होते उपस्थित मान्यवरांच्या हस्ते मुख्याध्यापक प्रभाकर आवाड यांचा सपत्नीक फेटा शेला व पुष्पहार देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी पुढे बोलताना महामुनी म्हणाले की आवाड सरांनी नोकरी करीत असताना स्मित भाषा शांत संयमी गुणांचा अंगीकार करून त्यांनी तब्बल ३८ वर्ष नऊ महिने २८ दिवसाची ज्ञानदानाची निर्विवाद सेवा करून त्यांनी एक समाजासमोर आदर्श निर्माण केला असल्याचे मत व्यक्त करून त्यांना शुभेच्छा दिल्या आहेत. यावेळी ह.भ.प भगवान बाबा पाञुडकर,साहेबराव राठोड ,भागवतराव डाके, परमेश्वर शिंदे, यांनी मनोगत व्यक्त केली तर सत्काराला उत्तर देताना आवाड सर म्हणाले की शांती संयम भाषा हे गुण मी माझ्या आई वडिलांकडून घेतले आणि ही ३९ वर्षाची सेवा मी शिक्षक व इतर मित्रांच्या सहकार्यामुळेच यशस्वी करू शकलो असल्याचे त्यांनी सांगून सर्वांचे आभार या कार्यक्रमाचे प्रस्ताविक विठ्ठलराव आरबे सर यांनी केले तर सूत्रसंचालन इस्माईल सय्यद यांनी केले आणि आभार अविनाश राठोड यांनी मानले हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेतील व केंद्रातील सर्व शिक्षक व गावकऱ्यांनी परिश्रम घेतले या कार्यक्रमास शाळेतील व केंद्रातील सर्व शिक्षक गावकरी नातेवाईक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सत्कार सोहळ्यात वाल्मिकी समाज बांधव सामील होणार: नरेश पिव्हाळ

बीड। प्रतिनिधी

केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांची केंद्रीय मंत्रिमंडळात तिसऱ्यांदा निवड झाल्याबद्दल बीड जिल्हा रिपाइंच्या वतीने रामदास आठवले यांचा भव्य सत्कार बीड शहरात युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष तथा रिपाइंचे बीड जिल्हाध्यक्ष पप्पू कागदे यांच्या नेतृत्वाखाली शनिवार (दि.५) ऑक्टोबर रोजी सायंकाळी ठीक ५ वाजता छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगण येथे आयोजित करण्यात आला आहे. या भव्य सत्कार सोहळ्याचे आयोजक पप्पू कागदे यांच्या प्रमुख उपस्थितीत वाल्मिकी समाज बांधवांची पेठ बीड विभागातील बतारवेस या ठिकाणी वाल्मिकी समाज बांधवांच्या उपस्थितीत मंगळवार (दि.३०) ऑक्टोबर रोजी बैठक संपन्न झाली. या बैठकीस राजू जोगदंड, किसन तांगडे, प्रा. बाळासाहेब गव्हाणे, अविनाश जोगदंड, विलास जोगदंड आदी उपस्थित होते.

रामदास आठवले यांच्या बीड

शहरातील भव्य सत्कार सोहळ्याचे औचित्य साधून शनिवार (दि.५) ऑक्टोबर रोजी बीड शहरातील राजुरीवेस पासून छत्रपती शिवाजी महाराज चौकापर्यंत काढण्यात येणाऱ्या भव्य रॅलीत व सत्कार सोहळ्यात बीड शहरातील वाल्मिकी समाज बांधवांनी हजारोंच्या संख्येने सामील होऊन भव्य सत्कार सोहळ्याचे आयोजक पप्पू कागदे यांच्या पाठीशी वाल्मिकी समाजाची ताकद उभी करावी. असे आवाहन नरेश पिव्हाळ, सतपाल लाहोट, भारत पिव्हाळ, शुभम डूलगच, सुरज डुलगच, लखन पिव्हाळ, तिलक दिघानिया, मनू लाहोट, श्याम सीरसवाले, नक्की सागर, करण पिव्हाळ आदींनी केले आहे.

पवारांची उमेदवारी आणि जरांगे इफेक्टमुळे नरसिंह जाधव ठरणार परिवर्तनाची नांदी

प्रस्थापित पुढाऱ्यांच्या विरोधात मतदारांची नाराजी, नव्या चेहऱ्याला संधी

पाटोदा । प्रतिनिधी

बदलत्या राजकिय समीकरणामुळे आष्टी विधानसभा मतदारसंघात आगामी निवडणुकीत परिवर्तन होणार असल्याचे दिसून येत आहे. कारण आष्टी मतदार संघात शरद पवारांना मानणारा मोठा वर्ग आहे. त्यातच मराठा आरक्षणाबाबत सुरू असलेला लढा त्यामुळे मराठा, ओबीसीमधील वाढता संघर्ष यामुळे निवडणुकीचे समीकरण बदलले आहे. प्रस्थापित पुढाऱ्यांच्या विरोधात असलेली नाराजी व्यक्त होत आहे. त्यातच नवा चेहरा म्हणून ॲड. नरसिंह जाधव यांना शरदचंद्र पवार राष्ट्रवादीची उमेदवारी मिळाली तर ॲड. जाधव हे परिवर्तनाची नांदी ठरणार असल्याचे चित्र मतदार संघात दिसून येऊ लागले आहे.

आष्टी पाटोदा आणि शिरूर मतदार संघ विधानसभा निवडणुकीच्या तयारीला प्रशासकीय तसेच राजकीय पातळीवरही वेग येऊ लागला असून इच्छुक उमेदवार मतदार संघात पायाला भिंगरी लावून गावागावात जाऊन लोकांच्या भेटी घेऊन आपणच उमेदवार असल्याचे सांगून निवडणुकीत

सहकार्य करण्याची विनंती करत असल्याचे दिसून येत आहे. मात्र मतदारसंघात यंदा प्रस्थापितविरुद्ध तीव्र संताप व्यक्त केला जात असल्याने परिवर्तनाची लाट लोकांमध्ये दिसून येत असून, लोकसभा निवडणुकीत निर्णायक ठरलेले मतदार विधानसभा निवडणुकीतही आपला इफेक्ट दाखवून देतील असेच एकंदर वातावरण दिसून येत आहे. त्यातच भाजपच्या नेत्यांकडून मराठा आरक्षणाबाबत भूमिका स्पष्ट होत नसल्याने भाजपच्या नेत्यांविरुद्ध या मतदारसंघात मोठ्या प्रमाणात नाराजी आहे. लोकसभा निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे बजरंग सोनवणे अवघ्या सहा हजार मतांनी निवडून आले. पंकजा मुंडे यांच्या याच पराभवात आणि सोनवणे यांच्या विजयात सगळ्या मोठा हातभार लागला तो आष्टी विधानसभा मतदारसंघाचा. आष्टीमधून पंकजा मुंडे यांना ३२ हजार २५४ मतांचे मताधिक्य मिळाले. सुरेश धस, भिमराव धोंडे, अजित पवार गटाचे आमदार बाळासाहेब आजबे हे तीन मोठे नेते असताना बजरंग सोनवणे यांना येथे चांगले मते मिळालेत. तीन आमदार असतानाही भाजप उमेदवार मुंडे यांचे मताधिक्य घटल्याने भाजप नेत्यांविरोधात मुंडे यांना मानणाऱ्या मतदारांचा राग आहे.आता आष्टीमध्ये विधानसभा निवडणुकीचे जोरदार वारे वाहू लागले आहेत. पण तीन स्थानिक नेते महायुतीमध्ये आहेत. त्यामुळे महायुतीचे प्रमुख आणि इच्छुक काहीसे टेन्शनमध्ये आहेत.

विधानसभा निवडणुकीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार गटाकडून पाटोदा येतील शरद पवारची कट्टर समर्थक ॲड नरसिंह जाधव हे उमेदवारीसाठी इच्छुक असून त्यासाठी त्यांनी मतदारसंघात संपर्क दौराही जोरात सुरू केलेला आहे. पवारांचे एकनिष्ठ म्हणून जाधव कुटुंबीयांची जिल्हाभरात ओळख आहे. सामान्य मराठा समाजातील उमेदवार म्हणून जाधव यांच्याकडे पाहिले जात आहे. त्यामुळें जाधव यांना राष्ट्रवादीची उमेदवारी मिळणार असल्याने त्यांनाही लोकातून मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळत असल्याचे सध्या दिसून येत आहे. त्यामुळे जाधव यांना राष्ट्रवादीची उमेदवारी म्हणजे पवारांचा आशीर्वाद या आशीर्वादाबरोबरच मतदार संघात इफेक्टिव्ह ठरणाऱ्या जरांगे पाटील इफेक्ट हे समीकरण आगामी निवडणुकीत जाधव यांच्याच पत्थ्यावर पडणार असल्याचे चित्र आष्टी मतदार संघात दिसून येऊ लागले आहे.

आष्टी पाटोदा विधानसभा मतदारसंघाचे आतापर्यंत माजी आमदार भीमराव धोंडे, माजी आमदार साहेबराव दरेकर, माजी मंत्री सुरेश धस यांनी केलेले आहे. सध्या विद्यमान आमदार बाळासाहेब आजबे हे मतदार संघाचे नेतृत्व करीत आहेत. मात्र राज्यात घडलेल्या सत्तांतराच्या घडामोडीनंतर राजकीय समीकरण बिघडलेले आहे. त्यातच मराठा आरक्षनामुळे राज्यात सुरू असलेला मराठा विरुद्ध ओबीसी संघर्ष यामुळे मतदार संघातील गणितही अवघड होऊन बसलेले आहे. याचा प्रत्यय झालेल्या लोकसभा निवडणुकीत सर्वच पक्षांना आलेला आहे. त्यामुळे विधानसभा निवडणुकीसाठी उमेदवार देताना सर्वच पक्षांना तारेवरची कसरत करावी लागणार आहे.

२०१९ च्या निवडणुकीत ◀◀ पान ३ वर

ॲड.जाधव सर्वसामान्य उमेदवार

महाविकास आघाडीमध्ये या मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाची ताकद आहे. तर शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) आणि काँग्रेसची ताकद अस्तित्वापूर्ती आहे. स्थानिक पातळीवर शरद पवार इथून नवीन चेहऱ्याच्या शोधात असल्याची माहिती आहे. ॲड. नरसिंह जाधव या सामान्य मराठा समाजातील नवीन चेहऱ्याला त्यांच्याकडून रिंगणात उतरवले जाऊ शकते. असे झाल्यास पवारांचे निष्ठावंत म्हणून त्यांना आष्टी पाटोदा आणि शिरूर तालुक्यात मोठ्या प्रमाणात पवार समर्थकांची साथ मिळू शकते तसेच मराठा आंदोलक जरांगे समर्थकही सर्वसामान्य मराठा समाजाच्या कुटुंबातील उमेदवार म्हणून जाधव यांच्या पाठीशी राहतील असे झाल्यास आष्टी मतदार संघात २०२४ च्या निवडणुकीत परिवर्तन आणि नव्या नेतृत्वाला संधी मिळू शकते अशी चर्चा होताना दिसून येत आहे.

तालुकास्तरीय मैदानी क्रिडा स्पर्धेत पिंपळवाडी विद्यालयाचे यश

नवगण राजुरी । प्रतिनिधी

क्रिडा व युवक सेवा संचालनालय पुणे, क्रिडाधिकारी कार्यालय बीड यांच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आलेल्या तालुका पातळीवरील शालेय मैदानी क्रिडा स्पर्धेत पिंपळवाडी विद्यालयाच्या मुलींनी घवघवीत यश मिळविले आहे.

सैनिकी विद्यालय बीड येथे पार पडलेल्या तालुकास्तरीय शालेय मैदानी क्रिडा स्पर्धेत पिंपळवाडी विद्यालयाच्या विद्यार्थीनींनी नेत्रदिपक यश मिळविले आहे. १४ वर्ष मुलीच्या वयोगटात १०० मीटर धावणेमध्ये कु.वाळेकर स्नेहा रघुनाथ प्रथम, ४०० मीटर धावणे गटात कु.दहे रूपाली बिभीषण द्वितीय तर १७ वर्ष वयोगटात १५०० मीटर धावणेमध्ये कु.वायकर अमृता अंगद द्वितीय, ३०० मीटर धावणे गटात कु.दहे संचिता प्रकाश प्रथम क्रमांक पटकावला आहे. सर्व यशस्वी खेळाडूंचे आदर्श शिक्षण संस्थेचे सचिव माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर, युवा नेते रोहित क्षीरसागर, संस्थेचे प्रशासन अधिकारी डॉ.राजा मचाले, कार्यवाहक एम.ए.राऊत, मुख्याध्यापक प्रदिप जगताप, क्रिडा शिक्षक हनुमंत येवले सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, ग्रामस्थांनी अभिनंदन केले.

श्रमाची परिकाष्टा करून मिळवलेले यश हे कौतुकास्पद असते - डॉ.सुरेंद्र आलुरकर

माजलगाव । प्रतिनिधी

आपल्या अभ्यासाच्या क्षेत्रामध्ये अद्यावत असणे ते कार्य प्रामाणिकपणे करणे व त्या क्षेत्राशी आत्मीयतेने जोडले जाणे यातूनच गुणवत्ता सुधारत असते. भा. शि. प्र.संस्थेतील तीनही महाविद्यालयाने श्रमाची परिकाष्टा करून मिळवलेले यश हे निश्चितच कौतुकास्पद आहे असे प्रतिपादन भा.शि.प्र संस्थेचे अध्यक्ष डॉ. सुरेंद्र आलुरकर यांनी येथील सिद्धेश्वर महाविद्यालयामध्ये दिनांक १ ऑक्टोबर रोजी संपन्न झालेल्या नॅक मूल्यांकन आढावा बैठकीमध्ये बोलताना केले.

यावेळी व्यासपीठावर भा.शि.प्र. संस्थेचे कार्यवाह डॉ.हेमंत वैद्य संस्थेचे प्रशासकीय अधिकारी प्रा. चंद्रकांत मुळे यांची उपस्थिती होती. भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेतील तीनही महाविद्यालयाने नॅक मूल्यांकन प्रक्रियेमधून मिळवलेल्या यशामध्ये सर्व महाविद्यालयातील संस्था पदाधिकारी,प्राध्यापक,कर्मचारी पालक व

विद्यार्थी यांचे मोठे योगदान असल्याचे डॉ.अलुरकर यांनी सांगितले. गुणवत्तेतील सातत्य हेच यशाचे कारण असल्याचे सांगताना शांत न बसता सतत प्रयत्नरत राहणे संपूर्ण जीवनभर मूल्याशी प्रामाणिक व जोडून राहणे हेच शैक्षणिक क्षेत्रातील शिक्षक कार्यकर्त्याचे कर्तुत्व असावे अशी अपेक्षा त्यांनी यावेळेस व्यक्त केली. वैयक्तिक मूल्यांकनातून जागरूकपणे केलेले कार्य व परिश्रम याचा परिपाक म्हणजे मिळालेले यश असल्याचे त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

यावेळी संस्थेचे कार्यवाह डॉ. हेमंत वैद्य यांनी मूल्यांकन करणे कोणा एका व्यक्तीचे काम न राहता ही एक सांघिक प्रक्रिया असल्याचे सांगत मिळालेले यश एकत्रित प्रयत्नातून मिळाल्याचे स्पष्ट केले. भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेच्या सर्व संकुलातील वाढती विद्यार्थी संख्येचा आलेख हे शैक्षणिक संस्थेच्या सामाजिक धोरणावर समाजाचे असलेले प्रेम असल्याचे दिसून येते. संस्थेचा समाजाशी,पालकांशी,शिक्षक कार्यकर्त्यांशी ◀◀ पान ३ वर

आमदार पाहिजे नवा म्हणूनच आष्टी मतदारसंघात अमोलराजे तरटेचीच हवा

पाटोदा । प्रतिनिधी

आष्टी पाटोदा शिरूर मतदार संघात सर्व सामान्य माणसाच्या सुख दुःखात धाऊन जाणारे, शेकडो युवकांना रोजगार उपलब्ध करून देणारे युवकांची दिलकी धडकन तथा शरदचंद्र पवार साहेब यांचे कट्टर खंदे समर्थक युवा उद्योजक अमोलराजे तरटे यांचीच हवा असून शहरासह गावागावाच्या पारावर त्याचीच चर्चा सर्व समाज करताना दिसत आहेत. गोरगरिबांचे कैवारी, हक्काचा माणूस, सुशिक्षित उमेदवार म्हणून अमोलराजे तरटे यांचीच सध्या आष्टी मतदारसंघात चर्चेचा विषय ठरत असून त्यांना आष्टी पाटोदा शिरूर मतदार संघात वाढता पाठींबा मिळत असून त्यांना पवार साहेब यांनी उमेदवारी दिल्यास बीड लोकसभा उमेदवार सारखा आष्टी पाटोदा शिरूर मतदार संघात आमदार होऊ शकतो यामुळे पवार साहेबांनी स्वत:ची घरं न भरणाऱ्या उमेदवारा पेक्षा फक्त आणि फक्त

विकासकामांनाच प्राधान्य देणार्या सर्वसामान्य गरिबांच्या व्यथा जाणणारा,सर्व सामान्यांचा सुख दुःखात धाऊन जाणारा शेकडो युवकांना रोजगार उपलब्ध करून देणारे युवानेते अमोलराजे तरटे यांना विधानसभेत

◀◀ पान ३ वर

कार्यारंभ आदेश पारित

बीड । प्रतिनिधी

पालकमंत्र्याकडे केलेल्या अविरत पाठपुराव्यामुळे माजी नगरसेवक अमर नाईकवाडे आणि फारुख पटेल यांच्या प्रयत्नांना दोन महिन्यानंतर यश आले असून दिनांक ३० सप्टेंबर रोजी मोंढा रोड सिमेंट रस्त्याच्या कामाचे कार्यारंभ आदेश पारित करण्यात आले आहेत. पावसाचा अंदाज पाहून लवकरच कामाला सुरुवात करण्यात येणार असून ते काम गुणवत्तापूर्ण होईल यासाठी आम्ही प्रयत्नशील असल्याचे अमर नायकवाडे यांनी म्हटले आहे.

एमआयटी विश्वशांती विद्यापीठ पुणे यांचा समर्पित जीवन गौरव पुरस्कार महंत लक्ष्मण महाराज मेंगडे यांना जाहीर

नेकनूर । प्रतिनिधी

विज्ञान अध्यात्म आणि तत्वज्ञान जागतिक परिषदेचे औचित्य साधून संबंध वारकरी संप्रदायाचा ध्यास आणि श्वास असणाऱ्या अध्वर्य ,घराण्यातील सत्पुरुष म्हणून एम.आय.टी. विश्वशांती विद्यापीठ, पुणे यांच्या वतीने सद्गुरु बंकटस्वामी महाराज संस्थानचे सर्वेसर्वा महंत गुरुवर्य लक्ष्मण महाराज मेंगडे यांना यावर्षीचा समर्पित जीवन गौरव पुरस्कार जाहीर करण्यात आला असून ३ ऑक्टोंबर रोजी जागतिक परिषद् सोहळ्यात पुणे येथे हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. यासंबंधीची घोषणा

व तसे निमंत्रण श्री.महंत लक्ष्मण महाराज मेंगडे यांना मिळाले असून संतश्रेष्ठ श्री.ज्ञानेश्वर माऊली जन्म उत्सव सप्तशतकोत्तर सुवर्ण महोत्सवी वर्ष व श्री. संत जगत्गुरु श्री.तुकाराम महाराज यांचे ३७५ व्या वैकुंठ गमन सोहळा वर्ष पर्वात विज्ञान अध्यात्म आणि तत्वज्ञानाची सांगड असलेल्या जागतिक परिषदेच्या ◀◀ पान ३ वर

मराठी पत्रकार परिषदेच्या पाटोदा तालुकाध्यक्षपदी अजय जोशी, सचिवपदी हमीदखान पठाण यांची निवड झाल्याबद्दल त्यांचा परिषदेचे जिल्हाध्यक्ष विशाल साळुंके यांनी सत्कार केला. यावेळी जिल्हा कोषाध्यक्ष छगन मुळे, मराठी पत्रकार परिषदेचे राज्य कार्यकारिणी सदस्य विलास डोळसे, जावेद शेख, अनिल गायकवाड, दिगांबर नाईकनवरे, सय्यद फय्याज आदी.

ऋषिकेश लोमटे यांची बीड जिल्हा शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष प्रमुखपदी निवड

अंबाजोगाई । प्रतिनिधी

येथील ऋषिकेश आण्णासाहेब लोमटे यांची शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाच्या बीड जिल्हा (केज - धारूर - अंबाजोगाई - परळी) कक्ष प्रमुखपदी निवड करण्यात आली आहे. याबाबत त्यांना राज्य कक्ष प्रमुख रामहरी राऊत यांनी निवडीचे पत्र दिले आहे.

निवड पत्रात नमूद करण्यात आले आहे की, राज्याचे मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे, खासदार डॉ.श्रीकांतजी शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि सूचनेनुसार वंदनीय बाळासाहेब ठाकरे शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाच्या बीड जिल्हा - (केज - धारूर - अंबाजोगाई - परळी) कक्ष प्रमुख या पदासाठी आपली ६ महिन्यांकरिता निवड करण्यात येत आहे. शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाच्या माध्यमातून आपण गोर-गरीब, गरजू आणि आर्थिक दुर्बल घटकांतील रूग्णांना धर्मादाय रूग्णालयात (१० टक्के) राखीव खाटा उपलब्ध करून देणे, निकषांत बसत असलेल्या गरीब रूग्णांवर पुर्णतः मोफत किंवा सवलतीच्या दरात शस्त्रक्रिया करण्यासंदर्भातील मदत तसेच महात्मा फुले जनआरोग्य योजनेअंतर्गत नोंदणी असलेल्या रूग्णालयांमध्ये गरजू रूग्णांना शस्त्रक्रिया मोफत करणे संदर्भात योग्य मार्गदर्शनासाठी सदैव तत्पर रहावे. गंभीर-महागड्या शस्त्रक्रिया करावयाच्या असलेल्या गोरगरीब गरजू रूग्णांना भरीव प्रमाणात अर्थसहाय्य व्हावे याकरीता पंतप्रधान वैद्यकीय सहाय्यता निधी, मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी, श्री.सिध्दिविनायक ट्रस्ट, टाटा ट्रस्ट यांसारख्या विविध ट्रस्टच्या माध्यमातून मदत मिळवून देण्यासाठी थेट शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष मुख्य कार्यालयास संपर्क साधावा. असे महाराष्ट्र राज्याचे शिवसेना वैद्यकीय मदत कक्षप्रमुख रामहरी भिमराव राऊत यांनी निवडपत्र देताना नमूद केले आहे. ऋषिकेश लोमटे हे शिवसेना (शिंदे गट) अंबाजोगाईचे पहिले शहरप्रमुख आहेत. ते व्यावसायाने इंजिनियर आहेत. कुशल संघटक, उत्तम वक्ते आहेत. समाजसेवेचा वारसा त्यांना लोमटे (नवाब) कुटुंबातूनच मिळाला आहे. शिवसेना शहरप्रमुख झाल्यापासून त्यांनी अंबाजोगाई शहरात प्रशांत नगर भागात प्रशस्त शिवसेना शहर मध्यवर्ती कार्यालय सुरू केले.

संघटनात्मक बांधणीतुन समाजाचे एकत्रीकरण कायमच हिताचे ठरते -नंदकुमार गादेवार

पुरुष महासभेच्या अध्यक्षपदी सूर्यकांत महाजन तर महिला महासभेच्या अध्यक्षपदी सुप्रिया चिद्रवार

केज । प्रतिनिधी

बीड जिल्हा आर्यवैश्य महासभेचे काम नेहमीच कौतुकास्पद राहिले आहे त्यांचा आदर्श ईतर जिल्ह्यातील महासभेच्या टीमने घेण्याची गरज असल्याचे मत महाराष्ट्र आर्यवैश्य महासभेचे राष्ट्रीय अध्यक्ष नंदकुमार गादेवार यांनी व्यक्त केले बीड जिल्हा आर्यवैश्य महासभेच्या नवनिर्वाचित कार्यकारिणी पदग्रहण व गुणवंतांच्या सत्कार व काशी अन्नसत्रमच्या नवनिर्वाचित

पदाधिकाऱ्यांच्या सत्कार समारंभाप्रसंगी ते बोलत होते

येथील हॉटेल नीलकमल येथे आयोजित कार्यक्रमास सत्कारमूर्ती म्हणून काशी अन्नसत्रमचे नंदकुमार गादेवार , विलास बच्चू , देवकी व्यंकटेश्वरलु , बांधकाम समितीचे अध्यक्ष भानुदास वट्टमवार , संघटक प्रदीप कोकडवार , सौ माधुरीताई कोले , सौ बबिता आष्टीकर , विकास डुबे , अनिल चिद्रवार , अजित भावठणकर , अभय कोकड , यांची प्रमुख उपस्थिती होती. वासवीमाता व रंगनाथ महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून व गणेश वंदनेसह राज्यगीताने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली . पुरुष महासभेचे नवनिर्वाचित अध्यक्ष म्हणून सूर्यकांत महाजन , सचिव म्हणून अजय रुद्रवार , कोषाध्यक्ष म्हणून बालाजी बासटवार , कार्याध्यक्ष म्हणून वैभव झरकर , यांची तर महिला महासभा नवनिर्वाचित अध्यक्षा म्हणून सौ. सुप्रिया चिद्रवार , सचिव सौ. मनीषा झरकर , कोषाध्यक्ष सौ.मेघाताई ◀◀ पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

पुण्यात सात नवीन पोलिस ठाण्यांना मंजुरी, ६० कोटींच्या निधीची तरतूद

पुणे । प्रतिनिधी

गृह विभागाने पुणे पोलिस आयुक्तालयात सात नवीन पोलिस ठाण्यांना मंजुरी दिली आहे. त्यासाठी सुमारे ६० कोटी रुपयांच्या निधीची तरतूद करण्यात आली आहे. शहराचा वाढता विस्तार आणि कायदा सुव्यवस्थेच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय घेण्यात आला आहे. या नवीन पोलिस ठाण्यांमधील कामकाज येत्या आठवडाभरात सुरू होइल, अशी माहिती पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांनी दिली.

पुणे पोलिस आयुक्तालयात सध्या ३२ पोलिस ठाणी आहेत. पोलिस आयुक्तालयातील भारती विद्यापीठ, सिंहगड रस्ता, चतु:शृंगी, लोणी काळभोर, लोणीकंद, हडपसर, वानवडी आणि कोंढवा पोलिस ठाण्यांचे विभाजन करून नवीन पोलिस ठाण्यांची निर्मिती करण्यात आली आहे. त्यानुसार आंबेगाव, नांदेड सिटी, बाणेर, खराडी, वाघोली, काळेपडळ आणि फुरसुंगी ही नवीन पोलिस ठाणी सुरू होणार आहेत. त्याला प्रशासकीय मंजुरी मिळाली आहे. नवीन पोलिस ठाणी सुरू करण्यासाठी जागाही निश्चित करण्यात आली आहे.

नवीन पोलिस ठाणे आणि प्राप्त निधी

- आंबेगाव – ७ कोटी ९ लाख
- नांदेड सिटी – ८ कोटी ६० लाख
- बाणेर – ८ कोटी ६० लाख
- खराडी– ७ कोटी ५० लाख
- वाघोली – ८ कोटी ७५ लाख
- काळेपडळ – १० कोटी २४ लाख
- फुरसुंगी – ८ कोटी ८१ लाख

नवीन पोलिस ठाण्यांच्या निर्मितीमुळे शहरातील कायदा सुव्यवस्था राखण्यास मदत होणार आहे. नवीन पोलिस ठाण्यांच्या पायाभूत सुविधांसाठी निधीची तरतूद करण्यात आली आहे. तसेच, नवीन ८१६ पोलिस कर्मचाऱ्यांच्या पदांना मंजुरी मिळाली आहे, असे पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांनी सांगितले.

श्री महालक्ष्मी मंदिरात नारीशक्ती नवरात्रोत्सव

पुणे । प्रतिनिधी

श्री महालक्ष्मी मंदिर, श्री बन्सीलाल रामनाथ अग्रवाल धार्मिक आणि सांस्कृतिक ट्रस्टच्यावतीने आयोजित सार्वजनिक नवरात्र उत्सवाचा प्रारंभ गुरुवार (दि. ३) पासून होत आहे. या दिवसापासून ते १२ ऑक्टोबरपर्यंत धार्मिक कार्यक्रमांसोबतच सांस्कृतिक, सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

संपूर्ण उत्सवात विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केलेल्या महिलांच्या हस्ते आरती आणि त्यांचा सन्मान करण्यात येणार आहे, अशी माहिती ट्रस्टच्या विश्वस्त आणि उत्सवप्रमुख डॉ. तृप्ती अग्रवाल यांनी सोमवारी पत्रकार परिषदेत दिली.यावेळी ट्रस्टचे प्रमुख संस्थापक विश्वस्त राजकुमार अग्रवाल, अमिता अग्रवाल, ॲड. प्रताप परदेशी, भरत अग्रवाल, तृप्ती अग्रवाल, प्रवीण चोरबेले, हेमंत अर्नाळकर आदी उपस्थित होते.गुरुवारी सकाळी ०८:०० वाजता पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांच्या हस्ते घटस्थापना होणार आहे. तसेच, सायंकाळी ०६:०० वाजता मंदिरावरील विद्युतरोषणाईचे उद्घाटन सहपोलीस आयुक्त रंजनकुमार शर्मा यांच्या हस्ते होईल.याशिवाय दहा दिवसांत श्री सुक्त अभिषेक, श्री विष्णू सहस्त्रनाम पाठ, महालक्ष्मी महायाग, महाआरती असे धार्मिक कार्यक्रम देखील मंदिरामध्ये होणार आहेत. सर्व धार्मिक कार्यक्रमांचे पौरोहित्य मिलिंद राहूरकर यांच्या मार्गदर्शनाखाली होतील. याशिवाय ढोल-ताशा वादनसेवा, पुणे मनपा महिला कर्मचारी सन्मान, नामांकित कंपन्यांमधील महिला एचआर यांचा सन्मान, महिला न्यायाधिशांचा सत्कार, लेखिका-कवयित्री सन्मान, पुणे मनपा स्वच्छता कर्मचारी सत्कार,कन्यापूजन, विविध शाळांतील शिक्षकांद्वारे भोंडला, वीरमाता-वीरपत्नी सन्मान, नारी तू नारायणी सन्मान सोहळा असे विविध कार्यक्रम होणार आहेत. भाविकांचा ५ कोटी रुपयांचा विमा काढण्यात आला आहे. सुरक्षेच्या दृष्टीने सर्व खबरदारी घेण्यात आली असून, मंदिर आणि आजूबाजूच्या परिसरात ५० सीसीटिव्ही कॅमेरे आणि २५ हून अधिक सुरक्षारक्षक असणार आहेत.

लक्ष्मण हाके यांनी मद्य प्राशन केले नाही; वैद्यकीय चाचणी अहवालातून स्पष्ट

पुणे । प्रतिनिधी

ओबीसी आंदोलक लक्ष्मण हाके यांनी मद्य प्राशन केल्याचा आरोप करीत त्यांना सोमवारी रात्री जमावाकडून धक्काबुक्की करण्यात आली होती. दरम्यान, हाके यांनी मद्य प्राशन केले नसल्याचा वैद्यकीय अहवाल ससून रुग्णालयाकडून प्राप्त झाला आहे. तसेच, या प्रकरणी २० ते २५ मराठा आंदोलकांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे, अशी माहिती पोलिसांकडून देण्यात आली.

हाके यांनी काही दिवसांपूर्वी मराठा आंदोलक मनोज जरांगे-पाटील आणि संभाजीराजे छत्रपती यांच्याबाबत केलेल्या वक्तव्यावरून काही तरुणांनी सोमवारी त्यांना जाब विचारला. या वेळी काही तरुणांनी हाके यांनी मद्य प्राशन केल्याचा आरोप केला. त्यावरून कोंढवा पोलिस ठाण्याच्या आवारात मध्यरात्री अडीच वाजेपर्यंत गोंधळ सुरू होता. मराठा आंदोलकांनी आक्रमक भूमिका घेत हाके यांच्या वैद्यकीय चाचणीची मागणी केली होती. त्यावर ''मी मद्यसेवन केलेले नाही. मी कोणतीही वैद्यकीय चाचणी करण्यास तयार आहे. हा कट पूर्वनियोजित होता. मला जीवे मारण्याचा प्रयत्न झाला,'' असे हाके यांनी म्हटले होते. दरम्यान, ''बेकायदेशीर जमाव जमवून धक्काबुक्की केल्याप्रकरणी कोंढवा पोलिस ठाण्यात २० ते २५ जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. ससून रुग्णालयात हाके यांची वैद्यकीय चाचणी करण्यात आली. त्या अहवालानुसार हाके यांनी मद्य प्राशन केलेले नाही. याबाबत न्यायवैद्यक प्रयोगशाळेचा अहवाल अद्याप प्राप्त झालेला नाही,'' असे पोलिस सह आयुक्त रंजन कुमार शर्मा यांनी सांगितले.

इंदापुरात पोलिस भरतीपूर्व प्रशिक्षण केंद्र चालकावर गोळीबार

पुणे । प्रतिनिधी

बारामतीमधील घटना ताजी असतानाच इंदापुरात अज्ञाताने एकावर गोळीबार केला, यामध्ये पोलिस भरती पूर्व प्रशिक्षण केंद्र चालवणारा युवक गंभीर जखमी झाल्याची घटना घडली. राहुल अशोक चव्हाण (वय ३०, रा.र शिरासोडी,ता. इंदापूर)असे गोळीबारात जखमी झालेल्या युवकाचे नाव आहे. बारामतीत विद्यार्थ्यांचा खून झाल्याची घटना सोमवारी सकाळी घडली, तर सायंकाळी इंदापूर शहरातील महाविद्यालयासमोरच ही गोळीबाराची घटना घडल्याची बातमी इंदापूर शहर तालुक्यात पसरल्यानंतर सर्वत्र खळबळ माजली आहे.

सोमवारी सायंकाळच्या दरम्यान शहरातील जुन्या पुणे-सोलापूर राष्ट्रीय महामार्गावरील कला, विज्ञान, वाणिज्य महाविद्यालयाच्या समोरून हा पोलिस भरतीपूर्व प्रशिक्षण चालवणारा युवक महाविद्यालयातून बाहेर पडत दुचाकीवर बसताना दुसर्या दुचाकीवरून आलेल्या एकाने आपल्या जवळील रिव्हॉल्व्हरमधून चार गोळ्या चव्हाणवर झाडल्या आणि तो दुचाकीवरून तोंड बांधून वेगात गाडी चालवत सोलापूरच्या दिशेने पसार झाला आहे.

घटना घडताच इंदापूर पोलिस घटनास्थळी दाखल झाले, त्यांनी जखमी चव्हाण यांना तातडीने खासगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. गोळीबाराचा हा प्रकार हा पूर्व वैमनस्यातून झाला असल्याची प्राथमिक माहिती मिळत असून, यातील आरोपीला पकडण्यासाठी दोन पथके तैनात करून आरोपीचा शोध सुरू आहे.

रात्री बारामतीचे उपविभागीय पोलिस अधिकारी डॉ.सुदर्शन राठोड यांनी घटनास्थळी भेट दिली, त्यांनी हल्ल्यातील जखमी युवकाची चौकशी केली तपास गतीने करण्याच्या सूचना इंदापूर पोलिस स्टेशनचे पोलिस निरीक्षक सूर्यकांत कोकणे यांना दिल्या. इंदापूर गोळीबार प्रकरणातील आरोपीला इंदापूर पोलिसांनी दोन तासांत वालचंदनगर येथून ताब्यात घेतले. या घटनेनंतर जागोजागी नाकाबंदी करण्यात आली होती. याचवेळी वालचंदनगर येथून या आरोपीला ताब्यात घेण्यात आले. हा आरोपी धीरज ऊर्फ सोन्या चोरमले शिरसोडी गावातीलच रहिवासी असून, जुन्या भांडणाच्या कारणातून हा गोळीबार करण्यात आल्याची माहिती बारामतीचे अपर पोलिस अधीक्षक गणेश बिरादार यांनी दिली. आरोपीकडून पोलिसांनी पिस्तूल ताब्यात घेतले आहे.

दोन अल्पवयीन मुली बेपत्ता, मुलींना आमिष दाखवून पळवल्याची तक्रार

पुणे । प्रतिनिधी

शहरातील संगमवाडी आणि अप्पर इंदिरानगरमधून दोन अल्पवयीन मुली बेपत्ता झाल्याच्या घटना समोर आल्या आहेत. मुलींना कोणीतरी आमिष दाखवून पळवून नेल्याची तक्रार पालकांनी केली आहे.

याबाबत मुलींच्या वडिलांनी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यावरून येरवडा आणि बिबवेवाडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, संगमवाडी भागातील एक १४ वर्षीय मुलगी रविवारी (ता. २९) सायंकाळी भाजी आणण्यासाठी घराबाहेर गेली. परंतु ती अद्याप घरी परतली नाही. कुटुंबीयांनी तिचा शोध घेतला. परंतु ती न सापडल्याने वडिलांनी येरवडा पोलिस ठाण्यात तक्रार दिली. तसेच, कोंढवा बुद्रूक येथील एका १७ वर्षीय मुलीने मैत्रिणीचा वाढदिवस आहे, अप्पर इंदिरानगरमधील तिच्या घरी जाते, असे सांगितले. परंतु ती अद्याप घरी परतली नाही. या प्रकरणाचा तपास येरवडा आणि बिबवेवाडी पोलिस करीत आहेत.

हडपसर परिसरात टोळक्याकडून नऊ वाहनांची तोडफोड

पुणे । प्रतिनिधी

शहरात किरकोळ वादातून गुंड टोळक्यांकडून वाहनांची तोडफोड करण्याचे प्रकार सुरूच आहेत. हडपसरमधील काळेपडळ भागात पूर्ववैमनस्यातून एका टोळक्याने मोटारी आणि रिक्षांसह नऊ वाहनांची तोडफोड केली. या प्रकरणी वानवडी पोलिस ठाण्यात पाचजणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या प्रकरणी अभिषेक उद्धव झगडे (वय २४, रा. स्वराज पार्क, काळेपडळ, हडपसर) यांनी वानवडी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यावरून साहिल कांबळे (रा. काळेपडळ, हडपसर) याच्यासह पाचजणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. साहिल आणि अभिषेक यांच्यात काही दिवसांपूर्वी वाद झाला होता. त्यानंतर अभिषेकने रागाने बघितल्याच्या कारणावरून साहिल आणि त्याचे साथीदार सोमवारी दुपारी काळेपडळ भागात आले. त्यांनी लाकडी दांडक्यांनी आणि दगडांनी दोन मोटारी आणि दोन टेम्पोसह पाच रिक्षांच्या काचा फोडून परिसरात दहशत पसरवली. याबाबत माहिती मिळताच वरिष्ठ पोलिस निरीक्षक संजय पतंगे, पोलिस उपनिरीक्षक संजय आदलिंग, अविनाश शिंदे यांनी घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी साहिल कांबळेला रात्री अटक केली असून, त्याच्या इतर साथीदारांचा शोध घेण्यात येत आहे.

जुन्या भांडणातून कार पेटवली तिघांवर गुन्हा, एकास अटक

बारामती । प्रतिनिधी

जुन्या भांडणातून घरासमोर लावलेली कार पेटवून देण्याचा प्रकार शिरवली (ता. बारामती) येथे शनिवारी (दि. २८) मध्यरात्री घडला. याप्रकरणी माळेगाव पोलिस ठाण्यात तीन जणांवर गुन्हा दाखल झाला आहे. यापैकी एकास अटक केली आहे. याप्रकरणी नितीन मारुती पोंदकुले (रा. शिरवली, ता. बारामती) यांनी बारामती शहर पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यानुसार रोहन प्रकाश बर्गे याच्यासह इतर दोन व्यक्तींवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, नितीन पोंदकुले यांनी त्यांच्या मालकीची कार (एमएच ४२ बीबी ३७७७) शनिवारी (दि. २८) साडेनऊ वाजता घरासमोर उभी केली होती. मध्यरात्री रोहन प्रकाश बर्गे व इतर दोन जणांनी कारवर दगडफेक करत पेट्रोल ओतले आणि कार पेटवून दिली. या आगीत कारचे एक लाख रुपयांचे नुकसान झाले. सुदैवाने हा प्रकार लागलीच लक्षात आल्याने आग नियंत्रणात आणण्यात आली. कारमधील सीएनजी गॅसची टाकी पूर्ण क्षमतेने भरलेली होती. अन्यथा मोठी दुर्घटना घडली असती, असे फिर्यादीत नमूद केले आहे. सहायक फौजदार संजय मोहिते हे तपास करीत आहेत.

मागील आठवड्यात शिरवलीत दरोड्याचा प्रकार घडला होता. त्याच दरोड्यातील रोहन बर्गे हा एक संशयित आरोपी आहे. त्यातूनच नितीन पोंदकुले यांचीही कार जुन्या भांडणातून पेटवून दिल्याची चर्चा होती. पोलिसांनी रोहन बर्गेला अटक केली आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाच्या शिरूर हवेली युवक अध्यक्षपदी योगेश शितोळे यांची निवड

वाघोली । प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष जयंतराव पाटील, युवकचे प्रदेशाध्यक्ष महेबुब शेख यांच्या मान्यतेने राष्ट्रवादी युवक शिरूर हवेली विधानसभा मतदारसंघ युवकच्या तालुका अध्यक्ष पदी न्हावी सांडस ता. हवेली येथील माजी सरपंच योगेश बाळासाहेब शितोळे यांची निवड करण्यात आली असून निवडीचे पत्र जिल्हाध्यक्ष स्वप्निल गायकवाड यांनी दिले आहे.

पुण्यात खासदार सुप्रियाताई सुळे यांच्या हस्ते शितोळे पत्र देऊन त्यांच्या सत्कार करण्यात आला. देशाचे नेते शरदचंद्र पवार यांच्या विचारानुसार सर्वसामान्य युवकांचे प्रश्न सोडवण्यासाठी कार्य करणार असल्याचे शितोळे यांनी सांगितले.

शितोळे यांच्या निवडीबद्दल प्रदेश प्रवक्ते विकास लवांडे, आमदार अशोक पवार, जिल्हाध्यक्ष जगन्नाथ शेवाळे, तालुकाध्यक्ष संदीप गोते, माजी सरपंच रामदास शिंदे आदींनी अभिनंदन केले आहे.

रुबी हॉल क्लिनिक वैद्यकीय क्षेत्रातील उत्तम तंत्रज्ञानाचा वापर करणारे भारतातील अग्रगण्य रुग्णालय : प्रा. डॉ. गजानन एकबोटे

पुणे : प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे मॉडर्न कॉलेज ऑफ फिजिओथेरपी आणि रुबी हॉल क्लिनिक यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक हृदय दिनानिमित्त शनिवार, दि. २८ सप्टेंबर, २०२४ रोजी संस्थेच्या शिवाजीनगर येथील सभागृहात 'हृदयदान जनजागृती' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमास प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे मा. कार्याध्यक्ष प्रा. डॉ. गजानन र. एकबोटे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात ग्रीन कॉरीडॉरचे प्रात्यक्षिकने झाली. पोलीस विभागाच्या पूर्वपरवानगीने रुग्णवाहिकेचा मार्गक्रम बालगंधर्व चौक, घोले रोड, तुकाराम पादुका चौक, ज्ञानेश्वर पादुका चौक ते प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे सभागृह असा होता. कोणत्याही अडथळ्याशिवाय आणि विलंब न करता एखादा अवयव गरज असलेल्या रुग्णापर्यंत कसा पोहोचेल हे प्रात्यक्षिकाद्वारे दाखविण्यात आले. त्यानंतर कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. कार्यक्रमावेळी हृदयदान वरील प्रेझेंटेशन दाखविण्यात आले.

रुबी हॉल क्लिनिकचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. बेहराम खोदाईजी यांनी उद्घाटनपर भाषण केले. त्यानंतर सर्व मान्यवरांचे स्वागत आणि सत्कार करण्यात आला. डॉ. पुरवेझ के. ग्रांट यांनी रुग्णालय आणि वैद्यकीय विज्ञान क्षेत्रातील तांत्रिक प्रगती माहिती दिली. रुबी हॉल क्लिनिकने हृदय प्रत्यारोपणाच्या प्रक्रियेवर एक लघुपट सादर केला आणि समूह संचालक-वैद्यकीय सेवा डॉ. प्रसाद मुगलीकर यांनी प्रत्यारोपण कार्यक्रमाचा आढावा दिला. डॉ. कपिल झिरपे यांनी अवयवदानाचे महत्त्व आणि अवयवदानाची वाढती गरज याबद्दल सांगितले. डॉ. जगदीश हिरेमठ यांनी हृदय प्रत्यारोपणाच्या वैद्यकीय पैलूंबद्दल, ते कसे केले जाते याबद्दल विविध गोष्टींबद्दल माहिती दिली. डॉ. अशिष खनिजो यांनी अवयवदानाच्या प्रक्रियांबद्दल, ज्या प्रकरणांवर त्यांनी शस्त्रक्रिया केले आहे आणि हृदय प्रत्यारोपण क्षेत्रातील प्रगतीबद्दल माहिती दिली. या सर्वांनी अवयवदानाची गरज यावर भर दिला आणि जनतेला या व्यवस्थेत सहभागी होण्याचे आवाहन केले. या कार्यक्रमात अवयवदानाविषयीचे विविध गैरसमज दूर करण्यात आले. अवयवदानामुळे दुसऱ्या व्यक्तीला जीवनदान मिळते. जगणे सुकर होते. कार्यक्रमास उपस्थित असेलेले प्रा. डॉ. गजानन र. एकबोटे यांनी संस्थेच्या प्रगतीविषयी माहिती दिली. जेव्हा संस्थेच्या महाविद्यालयांमध्ये एखादा नवीन अभ्यासक्रम सुरु केला जातो तेव्हा त्या नवीन अभ्यासक्रमाची अंमलबजावणी कशाप्रकारे केली जाते याविषयी त्यांनी सांगितले. विविध क्षेत्रात प्रगती करण्यासाठी समाज आणि संस्थांच्या पुरोगामी आणि आधुनिक दृष्टिकोनावर त्यांनी भर दिला. अवयवदानाचे महत्त्व पटवून देत अवयव प्रत्यारोपण क्षेत्रात रुबी हॉल क्लिनिकच्या कार्याचे कौतुक केले तसेच भविष्यात रुबी हॉल क्लिनिकने असे कार्यक्रम अधिकाधिक घेण्याचे आवाहन केले. त्यानंतर त्यांनी रुबी हॉल क्लिनिकच्या संपूर्ण हृदय प्रत्यारोपण टीमचा सत्कार केला. त्यांनी रूबी हॉल क्लिनिकच्या टीमसोबतचा आपला हृदयस्पर्शी अनुभव सांगितला. डॉ. सरांनी अवयवदानाच्या महत्त्वावर भर दिला आणि काळाची गरज लक्षात घेता जनतेला अवयवदानाच्या उदात्त कार्यात सहभागी होण्याचे आवाहन केले. रुबी हॉल क्लिनिक हे वैद्यकीय क्षेत्रातील उत्तम तंत्रज्ञानाचा वापर करणारे भारतातील अग्रगण्य रुग्णालय असून या रुग्णालयात उत्तम सोई-सुविधा, तज्ञ डॉक्टर व उत्तम कर्मचारी वर्ग रुग्णसेवेसाठी उपलब्ध आहे, असे गौरवोद्गार डॉ. सरांनी काढले.

कॉसमॉस बँकेला सर्वोत्कृष्ट सहकारी बँकेचा पुरस्कार प्रदान

पुणे । प्रतिनिधी

कॉसमॉस बँकेला सन २०२३-२४ या आर्थिक वर्षाकरिता सर्वोत्कृष्ट सहकारी बँकेचा पुरस्कार केंद्रीय सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. मुंबई येथील दि महाराष्ट्र अर्बन को-ऑप. बँक्स फेडरेशनची ४५ वी वार्षिक सर्वसाधारण सभा व पुरस्कार वितरण सोहळा कॉसमॉस बँकेच्या मुख्य कार्यालयात 'सहकार सभागृहामध्ये' पार पडला.

कॉसमॉस बँकेस हा पुरस्कार ५,००० रुपये कोटींवरील ठेवी असलेल्या सहकारी बँकांच्या श्रेणीमध्ये प्राप्त झाला. बँकेतर्फे अध्यक्ष सीए मिलिंद काळे, उपाध्यक्ष सीए यशवंत कासार तसेच संचालक मंडळातील सदस्य व व्यवस्थापकीय संचालिका अपेक्षिता ठिपसे यांनी पुरस्कार स्वीकारला. सन्मानचिन्ह, पुष्पगुच्छ असे या पुरस्काराचे स्वरूप होते.

ऑडिटवर्ग, ठेवी आणि कर्जामधील वाढ, ढोबळ तसेच निव्वळ एनपीए, सीआरएआर, सीडीरेशो, ऑपरेटींग व नेट प्रॉफिट अशासारख्या विविध निकषांवर सदर पुरस्कार जाहीर करण्यात आले, यामध्ये कॉसमॉस बँकेने सर्वोत्कृष्ट बँकेचा प्रथम पुरस्कार प्राप्त केला आहे. यावेळी केंद्रीय सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ म्हणाले की, सहकारी बँका हा अर्थव्यवस्थेचा महत्वाचा कणा असून या बँकांच्या समोर असलेल्या अडचणी निश्चितपणे सोडविल्या जातील. नजीकच्या काळात त्यादृष्टीने देशाचे नवे सहकार धोरण जाहीर केले जाईल. यावेळी व्यासपीठावर सहकार आयुक्त दीपक तावरे, फेडरेशनचे अध्यक्ष अजय ब्रम्हेचा, उपाध्यक्षा वैशाली आवाडे तसेच कॉसमॉस बँकेचे अध्यक्ष सीए मिलिंद काळे, रिझर्व्ह बँकेचे संचालक सतीश मराठे व इतर मान्यवर उपस्थित होते